मंगळवार, ६ फेब्रुवारी २०२४
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - १६९
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) TUESDAY 6 FEBRUARY 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-169 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-14 ●PRICE-05

दैनिक आधुनिक केसरीचे लोकप्रिय यू-ट्यूब चॅनल घेऊन येत आहे...

YouTube

# माझा प्रेरणादायी प्रवास





आपण आयुष्याच्या प्रवासात संकटांवर केलेली मात आणि मिळवलेले उत्तुंग यश पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देणारे असेल तर आम्ही आपली विशेष व्हिडिओ मुलाखत घेऊ.
आपल्या जीवनप्रवासाच्या एका चित्रफितीसह ही मुलाखत जगभरात पोहचेल दैनिक आधुनिक केसरीच्या यू-ट्यूब चॅनलद्वारे.

## सज्ज व्हा जगाला प्रेरणा देण्यासाठी !

आपल्या मुलाखतीसाठी आमच्याशी खालील नंबरवर संपर्क करा

**90757 16739, 77439 18559, 76208 38883**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा झाला. प्रजासत्ताक दिनही साजरा झाला. आज महात्मा गांधी यांची पुण्यतिथी. या पार्श्वभूमीवर जरा मागील काळात एक चक्कर मारून येऊ या. काही दृश्ये मी आपल्याला दाखवणार आहे. आपल्याला ती काल्पनिक वाटतील पण त्यांना घडलेल्या घटनांचा आधार आहे. काही लेखातून, पुस्तकातून माझ्यापर्यंत पोहोचलेली ती समाजमनाची आंदोलने आहेत असे समजायला हरकत नसावी. सर्वत्र इंग्रजी राजवट. गोऱ्या साहेबांचा प्रभाव, दिमाख आणि तोरा. गावागावातल्या शाळा भरल्या आहेत. भिंतीवर पंचम जॉर्ज आणि महाराणी मेरी यांच्या तसबिरी विराजमान आहेत. धोतर, कोट, टोपी घालून लहान मुले शाळेत बसली आहेत. शाळेची सुरुवात ' भो पंचम जॉर्ज... ' अशा काहीतरी शब्दांनी गोऱ्या साहेबाला वंदन करून होते. सातासमुद्राकडून आलेला गोरा साहेब आमच्या या देशावर राज्य करतो. त्याच्या कृपेनेच सर्व काही होत आहे. शिक्षण, विज्ञान, नवनवीन शोध, संकल्पना त्यांच्यामुळेच आमच्यापर्यंत पोहोचत आहेत. अशी शिकत असलेल्या बालगोपाळांची कल्पना. इंग्रजांमुळेच आपल्या देशात सुधारणा होत आहेत अशी सर्वसामान्यांची सुद्धा भावना होत होती. आपल्यावर राज्य करून ते आपल्यावर जणू उपकारच करत आहेत असेही काहींना वाटत होते. साधारणपणे १९३१-३२ आणि त्यानंतरचा काळ. देशात स्वातंत्र्याचं वारं वाहू लागलेलं. इंग्रज आणि इंग्रजी सत्तेबद्दल कमालीचा असंतोष लोकांच्या मनात निर्माण झाला. सुभाष बाबू, सावरकर, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद यांच्यासारख्या असंख्य क्रांतिकारकांनी स्वातंत्र्याचे यज्ञकुंड धगधगते ठेवले होते. अशातच महात्मा गांधी नावाच्या एका महान नेत्याचा देशाच्या राजकीय पटलावर उदय झाला. गांधी नावाची सर्वसामान्यांवर मोहिनी पडली. मोठ्यातला मोठा आणि सामान्यातला सामान्य माणूस त्यांच्या एका हाकेवर सगळं काही करायला तयार, प्राण द्यायलाही तयार झाला. मिठाचा सत्याग्रह, दांडीयात्रा, चले जाव वगैरे चळवळीत लाखोंचा सहभाग. स्वातंत्र्याची चळवळ केवळ नेत्यांची राहिली नाही, जनतेच्या सहभागातून ती पुढे जाते आहे.






## आनंदी पहाट

## मूल्य आणि अध्यात्म अभ्यासणे आवश्यक

आधुनिक केसरी

आपल्या जीवनाचा अर्थ जाणून घेणे हे बहुतेकांसाठी आध्यात्म महत्त्वाचे असण्याचे मुख्य कारण आहे.आध्यात्मवाद, काहीतरी पवित्रता शोधण्यासाठी, लोकांना एक चांगली व्यक्ती बनण्यासाठी प्रयत्न करण्यास प्रोत्साहित करते. एक व्यक्ती म्हणून तुम्ही कोण आहात यावर चिंतन केल्याने सर्वसाधारणपणे मानवी अस्तित्वाचा अर्थ काय याविषयी तुमचे ज्ञान वाढू शकते. प्रार्थना, मंत्र आणि ध्यान यांसारखे आध्यात्मिक आरोग्य लागू करण्याचे अनेक मार्ग आहेत. आध्यात्मिक विकास हा अंशतः एखाद्याचा अंतर्बाह्य गतिमान प्रवास परस्पर प्रक्रिया आहे. या क्रमिक वाढीमध्ये सामान्यतः विकासाच्या तीन टप्प्यांचा समावेश होतो; शुद्धीकरण अवस्था, प्रकाशमय अवस्था आणि एकात्मक अवस्था ह्या होत. आपल्या मानवी विकासाच्या टप्प्यांचे ते प्रतिबिंब दाखवतात जसे, बालपण, किशोरावस्था आणि प्रौढत्व ही होय. आपल्या आध्यात्मिकतेत आपण स्वतः आपल्या सर्वात सुंदर आणि शक्तिशाली स्वरूपात जीवनाचा प्रवास करत असतो. अध्यात्म आपल्याला शांतता, जीवनाचा उद्देश आणि क्षमा या भावना देऊन तणावाचा सामना करण्यास मदत करू शकते. भावनिक ताणतणावाच्या वेळी किंवा आजारपणाच्या वेळी ते अधिक महत्त्वाचे बनते. अर्थाच्या निर्मितीमध्ये आध्यात्मिक मूल्यांमध्ये ऊर्जा, विकास आणि आशा यांचा स्त्रोत निर्माण करणे समाविष्ट आहे. आध्यात्मिक वास्तवाला अस्तित्वात असलेल्या सर्व गोष्टींसाठी अंतिम अर्थ-निर्माता मानले जाऊ शकते. आध्यात्मिक वास्तवाची मानवी भावना सर्व ज्ञात संस्कृतींमध्ये आहे. नैतिक आरोग्य म्हणजे एखाद्या व्यक्तीची योग्य आणि चुकीची जाणीव, नैतिक पद्धतीने वागण्याची त्यांची क्षमता प्रतीत करत असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### अभंग ही वारी | बळ देते ||

नको लपंडाव | खेळु माझ्या दैवा ||
अंतरीचा धावा | ऐके धनी ||१||
चंद्रभागे तीरी | धनी माझा आहे ||
तोच उभा राहे | माझ्या पाठी ||२||
इंद्रायणी सांगे | गाथा-ज्ञानेश्वरी ||
वेदना वैखरी | शुद्ध झाली ||३||
बोले सटवाई | ललाटीची भाषा ||
दैवा तुझी आशा | काय करू? ||४||
होऊनी ध्यानस्थ | पाहतो पंढरी ||
अभंग ही वारी | बळ देते ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

कोणी येकासी मरण- ।येतां, दिलें जीवदान ।
संकटास निवारण ।तोडितां सुख ॥५॥
रोगियास औषध ।सप्रचित आणी शुद्ध ।
तयासी होये आनंद ।आरोग्य होतां ॥६॥
तैसा संसारें दुःखवला ।त्रिविधतापें पोळला ।
तोचि येक अधिकारी जाला ।परमार्थासी ॥७॥

## घराघरात स्ववेंद, मनामनांत स्ववेंद, जनमनांत स्ववेंद !

आत्म योग मन से रहै,
मन इन्द्रिन कर साथ ।
इन्द्रि योग जब अर्थ से, विषय ज्ञान
जिवनाथ ।।३५।।(स्ववेंद द्वितीय
मण्डल सप्तम अध्याय) ०२/०७/३५
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
आत्म्याचा संबंध मनाशी, मनाचा इंद्रियांशी आणि इंद्रियांचा संबंध जेव्हा त्यांच्या विषयांशी होतो, तेव्हा आत्म्याला बाह्य जगताचे ज्ञान होते.



स्ववेंद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## जाणपणनिरूपण

आधुनिक केसरी

पण जर सतत वाईटच कर्म करत राहिल्यास अवगुणांना जवळ केल्यास या अतिशय सुंदर मानवी जन्माचा -हास झाल्याशिवाय राहत नाही. म्हणून सतत विवेकाने वागावे. जगात अनेक प्रकारची माणसं बघायला मिळतात. कोणी अतिशय सुंदर असतात तर कोणी कुरूप असतात. कोणी श्रीमंत असतात तर कोणी दोन वेळच्या अन्नासाठी दाही दिशा भटकतात. खरं तर दोन वेळचे अन्न न मिळाल्यामुळे हे जग सोडून जाण्याची वेळ कोणावरही येऊं नये. पण सचोटीने व्यवहार करताना श्रम हे करावेच लागतात जो सतत उत्साही ऊद्योगी असतो तो आपला उदरनिर्वाह चांगल्याप्रकारे करतो. पण आळशी मंदमती, ऐशोआरामी नुसतं बसुन खाणारा असा करंटा असतो म्हणजेच विद्यादान धनवान होतो तर अविद्येचा करंटा रहातो. दोन भाऊ आहेत एक अतिशय प्रामाणिकपणे कष्ट करून धनवान होतो तर दुसरा नुसतं बसून रहातो तो दोन वेळच्या अन्नासाठी महाग होतो. समाजात जगण्यासाठी ज्ञान हवे विद्या हवी, परोपकारी वृत्ती हवी, तरचं समाज तुमची दखल घेईल.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## विषय, वासना, इत्यादि सोडून भगवंताला शरण जावे

आधुनिक केसरी

भगवंताचे अस्तित्व जिथे पाहावे तिथे आहे. भगवंताचे मर्म ओळखायला, मी कसे वागावे हे प्रथम पाहावे. भगवंत आहे की नाही हे जाणण्याकरिता आपल्याला बुद्धी दिली आहे. भगवंत निश्चित आहे हे काहींना अनुभवाने कळले. आपण त्यांचे आप्तवाक्य प्रमाण मानले. भगवंताचे अस्तित्व जर निश्चित आहे तर त्याची ओळख तरी कशी करून घ्यावी ? बीजगणितामध्ये उदाहरण सोडविताना एक अज्ञात ' क्ष ' घ्यावा लागतो. उदाहरणाचे उत्तर येईपर्यंत त्या ' क्ष ' ची खरी किंमत काय आहे हे आपल्याला कळत नाही, पण तो घेतल्याशिवाय चालत नाही; त्याप्रमाणे, जीवनाचे कोडे सोडविण्यासाठी आज अज्ञात असा भगवंत आपल्याला गृहीत धरलाच पाहिजे. त्या भगवंताचे खरे स्वरूप, जीवनाचे कोडे सुटेल त्या वेळी आपल्याला कळेल. खरोखर, जन्ममरणापासून मुक्त होण्याचा मार्ग जो आपल्याला दाखवितो तो खरा आप्त. भगवंताला सर्वांत अधिक काय आवडते, हे संतांनी सांगून टाकले. ते म्हणजे ' आपण विषय, वासना इत्यादि सर्व काही सोडून भगवंताला शरण जावे.' आपण नेहमी विषयांनाच शरण जातो. भगवंताला जो शरण गेला त्याला जगाची भीतीच नाही उरत. सर्व चमत्कार करता येतात, पण भगवंताला शरण जाणे फार कठीण आहे. आपण जिना चढतो ते जिन्यासाठी नसून, वरच्या मजल्यावर जाण्यासाठी असते. वरच्या मजल्यावर जाणे हे साध्य असून, जिना हे त्याचे साधन आहे. त्याप्रमाणे तीर्थयात्रा, व्रते, नेमधर्म ही साधने असून, परमेश्वरप्राप्ती हे आपले साध्य आहे. पण परमेश्वरप्राप्ती बाजूलाच राहिली आणि आपण साधनालाच घट्ट धरून बसलो आहोत, याला काय करावे ? मूळ भगवंत हा निर्गुण, निराकार आणि अव्यक्त आहे, पण मनुष्य त्याला आपल्या कल्पनेमध्ये आणतो. आपल्या ठिकाणी असणारे गुण पूर्णत्वाने त्या भगवंताच्या ठिकाणी आहेत, अशी आपण कल्पना करतो. याचा अर्थ असा की, आपण प्रथम भगवंताला जडामध्ये पाहतो, आणि मग त्याच्या नामाकडे जातो. भगवंताने केलेली ही सृष्टी, आहे तशीच सर्व जरूर आहे. तिच्यामध्ये बदल करायला नको, बदल आपल्यामध्ये करायला हवा. आपले सगळे जीवन जर भगवंताच्या हातामध्ये आहे, तर मग जीवनातल्या सर्व घडामोडी त्याच्याच हातात आहेत यात शंका कोणती ? झाडाच्या मुळांना पाणी घातले की त्याच्या सर्व भागांना ते पोहोचते, तसे, भगवंताचा विसर पडू न दिला म्हणजे सर्व काही बरोबर होते. भगवंत हवासा वाटणे यामध्येच सर्व मर्म आहे. आत्मा हा समुद्रासारखा आहे; त्याचा अगदी लहान थेंब, त्याप्रमाणे हा जीव आहे. त्याची ओळख होऊन आत्म्याशी समरस होणे, हेच खरे तत्त्वज्ञान आहे. या आत्म्याचे नित्य स्मरण ठेवून आनंदात असावे.



## कान्होपात्रा

आधुनिक केसरी

तो अक्षय तरटी वृक्ष आजही कान्होपात्रेच्या विठ्ठलभक्तीची ग्वाही देत तिथे उभा आहे. संत कान्होपात्रा ने स्वतःला देवाची वधू म्हणवलं तरी तिचा विठ्ठल तिच्यासाठी आई होता. सखा होता. माय, बाप, बंधू, भगिनी होता. देहाच्या उपाधी सुटाव्या म्हणून देवाकडे प्रार्थना करते. कान्होपात्रेला काय हवं होतं? 'देगा प्रेमकळा-नाम तुझे' विठ्ठल तिच्यासाठी कनवाळू, मायमाऊली होता. दासाची कळकळ वागवणारा दीनांचा नाथ, कृपावंत मालक होता. भक्तांचा दास होता. ज्याच्या प्राप्तीसाठी चारी वेद सहाही शस्त्रं शिणली तो केवळ भक्तीने प्राप्त होतो. 'अगा वैकुंठीच्या राया, अगा विठ्ठल सखया' अशी आर्त हाक ती त्याला आपल्या संरक्षणासाठी मारत होती. कान्होपात्रेच्या अपूर्व भक्तीने अखेर तिला सर्वातून मुक्ती मिळाली. विठ्ठलाचे पाय न सोडता त्याच्या चरणी सहज देहत्याग घडावा हे पराकोटीच्या भक्तीखेरीज अशक्य होतं. कुणी गुरू नाही. काही परंपरा नाही. भक्तीचं वातावरण नाही.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, ६ फेब्रुवारी २०२४
adhunikkesari.com

# सर्वांचे दिवस फिरतात हे लक्षात ठेवा

## उद्धव ठाकरे : सत्तेचा दुरुपयोग कसा करायचा भाजपाने दाखवून दिले

आधुनिक केसरी न्यूज

**रत्नागिरी : राजन साळवींच्या विरोधात कोणी तक्रार केली? काय मिळाले तुम्हाला? सत्ता येते आणि जाते. अधिकाऱ्यांना सांगून ठेवतो, वेळ बदलते. कोणाला सोडणार नाही, सर्वांचे दिवस फिरतात, असा इशाराच उद्धव ठाकरे यांनी राजापूर येथे दिला. तसेच राजन साळवींच्या विरोधात जो उमेदवार आहे, तो जे पैसे वाटतोय त्याची चौकशी करा, अशी मागणीही उद्धव ठाकरे यांनी केली. उद्धव ठाकरे आज राजापुरात आहे. राजपूरमध्ये एका सभेत बोलताना त्यांनी हा इशारा दिला. सोमवारी मुद्दाम राजापूरात आलो. इथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आहे. बाजूलाच पवित्र दर्गा आहे. जो कोणी देशाला आपले मानतो, देशासाठी मरायला तयार आहे. लढायला तयार आहे हे आमचे हिंदुत्व आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.**



यावेळी उद्धव ठाकरे यांनी एसीबीने साळवी यांच्या घरातील संपत्तीची किंमत केलेली यादी वाचून दाखवली. या यादीवर सावंत नावाच्या व्यक्तीची सही आहे. राजन साळवींना धन्यवाद द्यायला आलो आहे. सुशांत चव्हाण तुम्ही महाराजांच्या मूर्तीची किंमत केली आहे. किती तर पाच हजार रुपये. बाळासाहेबांचा फोटो आणि खुर्ची याची किंमत दहा हजार रुपये. माझ्या वडिलांची किंमत मिंध्याना कळली पण तुम्हाला नाही कळली. सर्वांचे दिवस फिरतात हे लक्षात ठेवा आता त्यांचे दिवस आहेत, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला. सात पिढ्या आल्या तरी तुमच्या सात पिढ्या आल्या तरी त्याची किंमत करता येणार नाही. तुमच्या आई वडिलांची किंमत केली तर तुमची किंमत किती ? मिंध्याना त्यांच्या वडिलांची किंमत कळाली नाही म्हणून माझा बाप चोरताहेत, असा हल्लाच उद्धव ठाकरे यांनी चढवला. ठाकरे यांनी धूत पापेश्वर मंदिरात सपत्नीक दर्शन घेतले. पुन्हा ठाकरे राज येऊ दे, असे साकडे घालण्यात आले. मंदिराच्या परिसरात नव निर्माण सुरू आहे. त्या कामाची उद्धव ठाकरे पाहणी करणार आहे. आमदार राजन साळवी यांच्या फंडातून मंदिराचे काम प्रगतीपथावर आहे.

**भाजपाचे हिंदुत्व घरे पेटवणारे** : कुरुलकरबद्दल संघ आणि भाजपा का बोलत नाही ? आपली गुप्त त्याने पाकिस्तानला पुरवली असतील आणि ते सिद्ध झाले तर भर चौकात फाशी द्या . हे आमचे हिंदुत्व आहे . आमचं हिंदुत्व घरातल्या चुली पेटवणारे आहे, तर भाजपाचे हिंदुत्व घरे पेटवणारे आहे . मिंधेला तर हे भाग्य लाभू शकत नाही . सरकार आपल्या दारी म्हणत तो आला की म्हणतात गद्दार आपल्या दारी आला असं लोक म्हणतात असाही टोला उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदेंना लगावला . निवडणूक चिन्ह देण्याचा निवडणूक आयोगाला आहे . मात्र शिवसेना हे नाव देण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नाही . नाहीतर आम्ही निवडणूक आयुक्ताला धोंड्या म्हणू . आमच्या शिवसेनेचं नाव कितीही पिढ्या आल्या तरीही आम्ही आमचे नाव बदलणार नाही .शिवसेनेत गुंड, पुंड आणि षंढ हे मिंधेसोबत आहेत . आमच्याकडे जे लोक आहेत ते शिवसैनिक आहेत . असंही उद्धव ठाकरेंनी म्हटले आहे .

**देवेंद्र फडणवीस आता गप्प का ?** : गणपत गायकवाड म्हणाले की माझ्या मुलाला धक्काबुक्की झाली म्हणून मी चिडून गोळ्या घातल्या . पोलीस स्टेशनमध्ये पोलीस काही करत नाहीत म्हणून गोळीबार केला आणि मला पश्चात्ताप नाही हे गायकवाडच सांगत आहेत . मग भाजपा राहिली कुठे आहे शिल्लक ? राजन साळवी, सूरज चव्हाण, किशोरी पेडणेकर यांच्या घरांमध्ये जी माणसं पाठवत आहात . आता गप्प का ? ज्यांनी आदेश दिले आणि ज्यांनी कारवाई केली त्यांची लायकी दाखवल्याशिवाय राहणार नाही ,असा इशाराही उद्धव ठाकरेंनी दिला .

# संपूर्ण विश्वाला भारताची गरज : मोहन भागवत

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** अयोध्येत २२ जानेवारी रोजी राम मंदिर प्राणप्रतिष्ठा झाली. देवाचे आशीर्वाद आणि देवाच्या इच्छेमुळेच हे होऊ शकले, असे वक्तव्यं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले. पुण्यातील आळंदी येथे गीता भक्ती अमृतमहोत्सवी कार्यक्रमात ते बोलत होते. भागवत पुढे म्हणाले, “भारताला यापुढे आणखी ताकदीने पुढे यावे लागेल. जगाच्या पाठीवर भारताला आपले स्थान आणखे वर न्यावे लागेल, भारताने प्रगती साधली नाही तर जगाला अडचणींचा सामना करावा लागेल. अयोध्येत राम मंदिराचे निर्माण करण्यासाठी अनेक वर्षांचा संघर्ष आणि खूप त्याग केल्यानंतर २२ जानेवारी रोजी रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा करणे शक्य झाले, असेही ते म्हणाले. आताची पिढी खरंच भाग्यवान आहे, त्यांना अयोध्येत रामलल्लाचे दर्शन घेता येणार आहे. राम मंदिरांसाठी अनेकांनी प्रयत्न केलेच, पण देवाची इच्छा होती, त्यामुळेच हे होऊ शकले, असेही ते म्हणाले. प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला उपस्थित राहण्याचे



भाग्य मला मिळाले, याबद्दल मी स्वतःला भाग्यवान समजतो. मोहन भागवत पुढे म्हणाले, जर आगामी काळात कोणत्याही कारणामुळे भारताचा उदय होऊ शकला नाही तर विश्वाला अडचणींचा सामना करावा लागेल. याबद्दल जगभरातील बुद्धिजीवी वर्गाला कल्पना आहे. याबद्दल ते चर्चाही करतात. गीता परिवाराकडून गीता भक्ती अमृतमहोत्सव आयोजित करण्यात आला होता. आध्यात्मिक गुरु श्री गोविंद देव गिरी महाराज यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

# तणावमुक्तीसाठी विपश्यना आवश्यक; पंतप्रधान नरेंद्र मोदी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** विपश्यना ही प्राचीन भारताची आणि आधुनिक विज्ञानाची अनोखी देणगी असून या विपश्यनेमुळे आधुनिक जीवनशैलीत ताणतणाव दूर ठेवता येऊ शकतात. अगदी तरुणांपासून ते वयोवृद्धांपर्यंत सगळयांनाच विपश्यनेमुळे आयुष्यातील तणावाला सामोरे जाण्याची शक्ती मिळते, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. विपश्यना शिक्षक एस.एन. गोएंका यांच्या जन्मशताब्दीनिमित्त मुंबईत आयोजित एका कार्यक्रमात दृकश्राव्य माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी विपश्यना विषयाचे महत्त्व विषद केले. ते म्हणाले की, विपश्यना किंवा ध्यानधारणा याकडे एकेकाळी त्याग किंवा संन्यासाचे माध्यम म्हणून पाहिले जात होते. मात्र, आजच्या व्यवहारी जगात विपश्यनेकडे व्यक्तिमत्त्व विकासाचा मार्ग म्हणून पाहिले जाते. विपश्यनेमुळे कसे लाभ होतात त्याचे पुरावे आधुनिक विज्ञानाच्या मानकांनुसार सगळया जगासमोर आणण्याची गरज असल्याचे मतही पंतप्रधानांनी यावेळी व्यक्त केले. आपल्या जीवनात ताण आणि त्यामुळे येणारे नैराश्य यांचा प्रत्येकाला अनुभव येत असतो. मात्र विपश्यनेच्या शिकवणीतून या ताण-तणावापासून स्वतःला दूर ठेवण्यास मदत होत असते असे पंतप्रधांनांनी सांगितले. एस. एन. गोएंका हे ‘एक आयुष्य एक ध्येय’ या उक्तीचे समर्पक उदाहरण आहेत. विकसित भारताच्या दृष्टीने आपली वाटचाल सुरू असताना गोएंका यांची शिकवण आणि समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी दिलेले योगदान प्रेरणादायी असल्याचेही पंतप्रधान म्हणाले. गौतम बुद्धांच्या प्रेरणेने गोएंका गुरुजी म्हणायचे की जेव्हा लोक एकत्र येऊन ध्यानधारणा करतात तेव्हा त्याचा परिणाम खूप प्रभावी असतो.

# माऊलींच्या मंदिरासाठी ग्रामस्थांची १ कोटी ५५ लाखांची देणगी

## २६ कोटींचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

गणेश बोरुडे

पाथर्डी : श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या २६ कोटी रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री. नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे खरवंडी कासार (ता.पाथर्डी जि.अहमदनगर) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही १ कोटी ५५ लाख रुपये झाली.

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. या भव्य दिव्य मंदिरासाठी लागणारा खर्च अंदाजे २६ कोटी रूपये इतका आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.




# घराणेशाहीची व्याख्या

आधुनिक केसरी

काँग्रेसच्या मानसिकतेमुळे देशाचे खूप मोठे नुकसान झाले आहे. काँग्रेसने आपल्या देशाच्या सामर्थ्यावर कधीही विश्वास ठेवला नाही. काँग्रेस आपल्याला शासक मानत आला आहे आणि जनतेला छोटे समजत आले आहेत. त्याचे नुकसान आपल्याला सहन करावे लागले आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. पंडित नेहरु आणि इंदिरा गांधी यांनी देशाच्या जनतेला कमी लेखले होते, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. काँग्रेसचा विश्वास फक्त एका कुटुंबावरच राहिला आहे. त्या घराणेशाहीत काँग्रेस पक्ष गुरफटला असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. तसेच थँक्यू अधीर रंजनजी म्हणत त्यांनी घराणेशाहीची व्याख्या सांगितली आहे. आम्ही घराणेशाही हे जेव्हा म्हणतो, तेव्हा जो पक्ष कुटुंब चालवतो आणि आपल्याच पक्षातल्या लोकांना प्राधान्य देतो त्याचा आम्ही विरोध करतो. एकच घराणे सगळे निर्णय घेते त्याला आम्ही घराणेशाही म्हणतो. लोकशाहीत हे योग्य नाही. राजकारणात एका कुटुंबातले दहा लोक आले तरीही काहीच प्रश्न नाही. पण ते त्यांच्या प्रतिभेवर आणि लोकांनी दिलेल्या मतांवर निवडून आलेले हवेत, लादलेले नकोत, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे. कुटुंब किंवा विशिष्ट घराणेच जेव्हा पक्ष चालवते तेव्हा घराणेशाहीचा प्रश्न आहे. आम्हालाही वाटतं की या विषयावर चर्चा केली गेली पाहिजे. घराणेशाहीचे राजकारण हा सगळ्यांच्या चिंतेचा विषय असला पाहिजे. एखाद्या कुटुंबातले दोन काय दहा लोक प्रगती करत असतील तर मी स्वागत करेन. प्रश्न हा आहे की घराणेच जिथे पक्ष चालवतात ते लोकशाहीसाठी हे संकट आहे. एक पक्ष त्याचा काँग्रेस एका कुटुंबातच गुरफटून गेलेला पक्ष आहे, असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात म्हटले आहे. तसेच अधीर रंजन चौधरी यांचे आभार मानले आणि हा मुद्दा मला बोलता आला त्यामुळे तुम्ही हा विषय काढलात बरं झालं असंही मोदी त्यांना उद्देशून म्हणाले.निवडणुकीचे वर्ष होते काहीतरी नवे घेऊन समोर यायचं. आज विरोधी पक्षाची जी अवस्था झाली आहे ना त्याला सर्वाधिक कोण जबाबदार असेल तर काँग्रेस. काँग्रेसला दहा वर्षात विरोधी पक्ष म्हणूनही मोठे होता आलं नाही. विरोधात इतरही तेजस्वी लोक आहेत. मात्र त्यांची उमेद घालवण्याचंही कामही काँग्रेसने केले. तरुण पिढीला पुढे जाऊ दिले नाही. काँग्रेसने विरोधी पक्षाचे, स्वतःचे, संसदेचे आणि देशाचे खूप मोठे नुकसान केले. देशाला खूप चांगल्या विरोधी पक्षाची गरज आहे. देशाने घराणेशाहीची खूप मोठी किंमत मोजली, काँग्रेसलाही ती किंमत मोजावी लागली, असेही मोदी यांनी म्हटले आहे.

# विद्यार्थ्यांनो! आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जा




डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**विद्यार्थ्यांवरील तणाव हा देशभरात चिंतेचा विषय ठरला आहे. स्पर्धाचा ताण येऊ देऊ नका, असा संदेश बोर्डाच्या परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी व त्यांच्या पालकांशी साधलेल्या वार्षिक संवादात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी दिला, त्याच दिवशी कोटा येथे एका विद्यार्थिनीने आत्महत्या करून स्वतःला संपविले.या विद्यार्थिनीने आत्महत्या केल्यामुळे हळहळ व्यक्त केली जात आहे. जेईई परीक्षेची तयारी करणाऱ्या १८ वर्षांच्या एका विद्यार्थिनीने सोमवारी कोटा येथे तिच्या घरी गळफास लावून आत्महत्या केली. स्वतःचे वर्णन 'अपयशी' असे करणारी आणि पालकांची माफी मागणारी चिठ्ठी तिने आत्महत्येपूर्वी लिहून ठेवली. तणाव किंवा नैराश्य कोणालाही येऊ शकतं.**

कोणाला नोकरीमध्ये अडचणी असतात, कोणाला व्यवसायात तोटा होत असतो, तर कोणाची परीक्षेत चांगले गुण मिळवण्याची धडपड सुरू असते. विद्यार्थी दशेत तणाव किंवा नैराश्य जाणवत असेल, तर मग गंभीरपणे त्याचा विचार करण्याची आवश्यकता असते. या वयात अशा समस्येशी सामना करणं किंवा त्यातून बाहेर पडणं खूप आव्हानात्मक असतं. त्यामुळे कधी कधी अपयश आले, म्हणून आत्महत्या करण्यापर्यंत मजल जाते. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार तणाव किंवा नैराश्य येणं हे सामान्य आहे; परंतु काळजीची गोष्ट ही, की लोक याच्यावर उपाय शोधण्यासाठी डॉक्टरांकडे जायला तयार होत नाहीत. यापेक्षाही अधिक आश्चर्याची गोष्ट म्हणजे मुलांमधील समस्यांचं प्रमुख कारण पालकांकडून त्यांच्याविषयीच्या अपेक्षा हे असतं.पालकांनी आपल्या पाल्याला समजून घेतलं पाहिजे.आपल्या पल्यांकडून अवास्तव अपेक्षा बाळगू नये. मानसोपचारतज्ज्ञांच्या मतानुसार विद्यार्थ्यांना तणाव आला असेल, तर त्यात पालकांची भूमिका खूप महत्त्वाची असते. मुलगा शाळेत जाऊ लागला, की लगेचच पालक त्याच्याकडून अपेक्षा, विशेषतः चांगले मार्क्स मिळण्याची अपेक्षा लादायला लागतात. विद्यार्थ्यांवर पालकांच्या अपेक्षांचं ओझं इतकं येतं, की या अपेक्षांचा विचार त्यांच्या मनात येत राहतो. समस्यांचं मूळ इथेच रुजतं. अभ्यास करणारा कोणीही नापास होणार नाही. फक्त पाठांतरावर अवलंबून न राहता, तुम्हाला संबंधित विषयाचे किती ज्ञान मिळाले, यावर परीक्षेत भर असेल. तेव्हा भीती बाळगू नका तसेच परीक्षेचे दडपण घेऊ नका.अभ्यासाच्या नियोजनात  महत्त्वाच्या भागांकडे लक्ष देणे अपेक्षित आहे. वाचन, चिंतन/मनन, सराव व तज्ज्ञ-शिक्षकांचे मार्गदर्शन परिवारात संवाद आणि  भ्रमणध्वनी पासुन स्वतःला दूर ठेवणे हे ते  महत्त्वाचे भाग आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सकारात्मक दृष्टिकोन. सकारात्मक दृष्टिकोन म्हणजे भूतकाळातील अपयशाचा विचार न करता फक्त येणा-या परीक्षेचा विचार करणे, आपला स्वतःवर व स्वप्रयत्नांवर दृढविश्वास असणे. तसेच यदाकदाचित अपयश आल्यास त्याला खंबीरपणे सामोरे जाण्याची मानसिक तयारी ठेवणेही गरजेचे आहे. त्याचप्रमाणे सकारात्मक दृष्टिकोन वाढीस लागण्यासाठी काही गोष्टी टाळणे आवश्यक आहे. त्या म्हणजे आपल्याबरोबरच्या विद्यार्थ्यांशी तुलना, स्वतःच्या प्रयत्नांकडे लक्ष न देता देवादिकांच्या आशीर्वादासाठी अवाजवी धडपड व आपल्या सध्याच्या समस्यांबद्दल इतरांना दोष देण्याची मानसिकता. परीक्षेच्या तयारीत पालक आणि शिक्षकांचा वास्तववादी व सम्यक सहभाग अत्यंत गरजेचा आहे. तथापि, काही गोष्टी त्यांनीही कटाक्षाने केल्या पाहिजेत. उदा. पाल्याच्या स्ट्राँग पॉइंट्सवर



लक्ष केंद्रित करून त्याला प्रोत्साहन देणे. तसेच परीक्षा परीक्षार्थींच्या उन्नतीसाठी आहे; इतरांशी स्पर्धा करण्यासाठी नव्हे, ही जाणीव असावी. प्रयत्न करूनही पाल्याला अपयश आल्यास त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची तयारी आणि जेव्हा गरज असेल तेव्हा एक 'जादू की झप्पी' देण्यासाठी पुढाकार घेणेही आवश्यक आहे. शिवाय काही बाबी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत. उदा. इतर मुलांशी तुलना, पाल्याला त्याच्या भूतकालीन अपयशाची आठवण करून देणे, पाल्याकडून अवाजवी व अवास्तव अपेक्षा बाळगणे पालकांनी टाळावे. विद्यार्थ्यांनी पालकांशीव  शिक्षकांशी संवाद कायम राखावा, पालकांनी देखील मुलांशी संवाद साधत असायला पाहिजे.वेळेचे व्यवस्थापन, अभ्यासाचे नियोजन व सकारात्मक दृष्टिकोन या बाबींचा अंगीकार केल्यास परीक्षेच्या भीतीवर सहज मात करता येईल.   ताण कशामुळे येतो? स्वतःला सिद्ध करण्याची वेळ आली की 'मी कमी तर पडणार नाही ना?' याची भीती वाटणं हे ताणाचं महत्त्वाचं कारण. मग ती शाळा- कॉलेजची परीक्षा असेल, नोकरीचा इंटरव्ह्यू असेल, इंटर्नल प्रमोशनसाठीची परीक्षा असेल किंवा महत्त्वाच्या क्लाएंटसमोर ठरलेलं आपल्या उत्पादनाचं मार्केटिंग प्रेझेंटेशन असेल. एवढंच कशाला, आपल्या नवीन नाटकाचा पहिला-दुसरा प्रयोग, गाण्याचं रेकॉडग किंवा स्पर्धा, अशा सर्व ठिकाणी परीक्षार्थी मानसिकता सारखीच असते. आपल्या स्वतःकडूनच्या अपेक्षा, इतरांच्या आपल्याकडूनच्या अपेक्षा, त्या परीक्षेवर/ सादरीकरणावर आपलं भवितव्य अवलंबून असणं अशा अनेक कारणांमुळे ताण येऊ शकतो. दुसऱ्यांशी तुलना केल्यानंही कधी कधी ताण येतो. परीक्षा हॉलच्या दारात दुसरे विद्यार्थी एखाद्या मुद्द्याबाबत चर्चा करीत असतात. आपल्याला तो मुद्दा पटकन आठवत नाही आणि त्या क्षणी तो एकमेव प्रश्न आपलं सर्वस्व व्यापतो. परीक्षेला त्याच मुद्द्यावर प्रश्न आले आहेत आणि आपण ब्लँक होऊन नापास झालो आहोत, असं स्पष्ट चित्र दिसतंच आपल्याला. आपलं अस्तित्वच जसं काही त्या प्रश्नाच्या उत्तराशी जोडलं जातं. कोणतीही गोष्ट अशी जीवनमरणाचा प्रश्न झाली की, ताण प्रचंड वाढतो. वर सांगितलेली लक्षणं दिसायला लागतात. अशा वेळी आधी त्याची 'जीवनमरणाचा प्रश्न असण्याची पातळी' कमी करण्याची गरज असते. ताणाबाबत दीर्घश्वसन नेहमीच उपयोगी पडतं. चार पाच वेळा दीर्घ श्वास घेऊन सोडायचा, आधी थोडं शांत व्हायचं आणि मग स्वतःला प्रश्न विचारायचा, 'होऊन होऊन काय होईल? जेवढं वाटलं होतं त्यापेक्षा कमी मिळेल', 'पेपरमध्ये कशावरून यावरच प्रश्न येतील?' किंवा 'यांच्याशी मी माझी तुलना कशासाठी करू? मला जे येतंय ते न येणारे कित्येक विद्यार्थी आत्ता इथं असतील.' या विचारातून मन थोडं शांत झालं की, एखादा क्लू मिळतो आणि सगळं आठवायला लागतं. तिथपर्यंत पोहोचण्यासाठी मनाला जाणीवपूर्वक मदत करणं म्हणजेच तणाव व्यवस्थापन. एरवी वर्षभर शिकताना आपल्यापेक्षा पुढे असलेल्यांशी तुलना करायची. कारण त्यामुळे आपण वाढतो. पण परीक्षेच्या वेळी मात्र 'इतर अनेकांपेक्षा आपल्याला जास्त येतंय,' असा विचार करायचा. कारण वर्षभर आपली गरज 'ज्ञान मिळवणं' ही असते, पण या वेळी मात्र 'हिंमत मिळवणं' ही असते. साहचर्य आणि ताण आजच्या परिस्थितीत स्पर्धेचं जग, जागतिक मंदी, अनंत प्रकारच्या प्रवेश परीक्षा या गोष्टी पुनःपुन्हा चारही बाजूंनी कानावर पडत असताना भीती आणि परीक्षेचं साहचर्य फार सहज प्रस्थापित होऊ शकतं. परीक्षेची भीती घेण्याची ही सवय अतिशय सहज आपला स्थायिभाव होऊ शकते. झालेली असू शकते. या भीतीकडे एकदा डोळसपणे पाहून तिचं मूळ शोधायला हवं. त्यानंतर तारतम्य वापरून हा अनुकरणातून आलेला भाग कमी करणं शक्य असतं.

मुलांच्या बोर्डाच्या परीक्षा जवळ आल्या आहेत. अशा परिस्थिती ताणतणाव असणे सामान्य आहे. ते जास्त वाढल्यास अडचणी निर्माण होऊ शकतात. परीक्षेचा भ्यास व्यवस्थित व्हावा यासाठी खूप वेळ आणि मेहनत घ्यावी लागते. अभ्यासक्रम पूर्ण करण्याचे टेन्शन मुलांना असणार हे स्वाभाविक आहे. मात्र काही सोप्या टिप्सद्वारे मुलांची ही तणावग्रस्त मानसिकता आपण बदलू शकतो. टेन्शन न घेता अभ्यास करण्यासाठी या गोष्टी फायद्याच्या ठरतात. अभ्यासासाठी शांत जागा निवडा अभ्यासासाठी अशी जागा निवडा जिथे प्रकाश, हवा आणि शांतता आहे. या गोष्टींशिवाय कोणालाही अभ्यासावर लक्ष केंद्रित करणे फार कठीण आहे. वाचताना मोबाईल दूर ठेवा. निरोगी आहार घ्या परीक्षेदरम्यान तुमच्या आरोग्याला हानी पोहोचेल असे काहीही खाऊ नका. त्यामुळे गॅस, ॲसिडिटी, झोप, थकवा किंवा तब्येतही बिघडू शकते. त्यामुळे अभ्यासातही अडथळा येतो. शक्य तितके निरोगी अन्न खा, स्वतःला हायड्रेट ठेवण्यासाठी भरपूर पाणी प्या. चांगली झोप घ्या आरोग्यासाठी किमान ८ तासांची झोप घेणे आवश्यक आहे. जिथे काही विद्यार्थ्यांना रात्री अभ्यासावर लक्ष केंद्रित करता येते, तर काहींसाठी सकाळची वेळ चांगली असते. याशिवाय लक्ष केंद्रित करण्यासाठी मन शांत असणे खूप महत्वाचे आहे. ज्यामध्ये झोप खूप उपयुक्त आहे. नोट्स उपयोगी येतील वाचताना छोट्या नोट्स बनवल्याने गोष्टी वाचणे आणि लक्षात ठेवणे खूप सोपे होते. तुमच्या महत्त्वाच्या विषयांच्या नोट्स तयार करा. कोणताही पार्ट सर्व करण्याचा राहिला असेल तर तो नोट्सद्वारे कव्हर केला जाईल.

# नवोदय



प्रा. डॉ. सतीश मस्के
संपर्क क्र. : 9423397484

आधुनिक केसरी

**संध्याकाळची वेळ होती. साधारणत: आठ वाजले होते. विराट च्या घरचे सगळे टी.व्ही.पाहत पाहत जेवण करत बसले होते. विराटच्या भावाला म्हणजे जय ला पुरणपोळ्या आवडतात म्हणून त्याच्या आईने आज आमरस व पोळ्या केल्या होत्या. विराट चे पप्पा नंतर जेवण करतो म्हणून सोप्यावर काहीतरी लिहीत बसले होते. हे सारे जेवण करत असताना पप्पांना फोन आला. तो फोन विराटच्या शाळेमधून विराटच्या माधव सरांचा होता. पप्पांनी तो फोन उचलला व म्हणाले, " हॅलो, हॅलो..!' " मी विराटच्या शाळेमधून माधव सर बोलतो." " हा नमस्कार सर,बोला,बोला सर" "अहो, सर, तुमचा मुलगा विराट हा नवोदय विद्यालयाची परीक्षा पास झाला आहे."**

" हो सर... धन्यवाद सर" "विराट ला अभिनंदन सांगा" " हो सर, सांगतो,तो जेवण करतो आहे. अजून कोण कोण पास झाले आहेत सर." "विराटचे मित्र अजय आणि अतुल हे दोघेही पास झाले आहेत." "धन्यवाद सर" विराट,जय आणि त्यांची मम्मी जेवण करता करता सगळे उठून पप्पा जवळ आले. विराट पप्पाला म्हणाला, "पप्पा, पप्पा,काय झाले ?कुणाचा फोन आला होता." "अरे, विराट नवोदय विद्यालयाची परीक्षा पास झाला आहे...तुझं अभिनंदन." विराटच्या घरातील सगळ्यांनाच खूप खूप आनंद झाला. सगळेजण विराटच्या जवळ जाऊन पाठ थोपटून हातात हात देऊन अभिनंदन कराय लागले. विराटलाही खूप आनंद झाला. विराट तर खूप आनंदाने उड्या मारत होता. विशेष म्हणजे विराटच्या जवळचे त्याचे मित्र अजय आणि अतुल हे देखील परीक्षा पास झाले होते. इयत्ता पहिली पासून तिघांची चांगली मैत्री होती आणि ते तिघेही नवोदय विद्यालयाची परीक्षा पास झाले होते. अजय आणि अतुल हे दोघेही परीक्षा पास झाले असल्यामुळे विराटला खूप आनंद झाला होता. विराट चे मम्मी,पप्पा व त्याचा लहान भाऊ जय ही खूप खुश झाला होता. त्याचबरोबर आपला मुलगा विराट आपल्यापासून शिक्षणासाठी दूर बाहेरगावी जाणार याचं दुःख विराटच्या पप्पा,मम्मीला व जयलाही होत होतं. ते त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होतं. पण विराटचं चांगलं होत असेल, चांगला अभ्यास होत असेल, त्याचे जीवन तिथे चांगले घडत असेल तर आपल्याला मन खंबीर करावेच लागेल. या विचाराने विराटचे मम्मी, पप्पा व जय ही तयार झाले होते. विराट ची मम्मी पप्पांना सांगत होती की,त्याची बातमी द्या. पप्पा म्हणाले होते की, आपण त्याचा निकाल फक्त ऑनलाईन बघितला आहे. त्यामुळे बातमीचे नंतर बघू. अगोदर आपण खात्री करून घेऊ. दिवसा मागून दिवस निघून जात होते. दोन दिवसांनी अतुलच्या मम्मीचा फोन आला. त्यांनी सांगितले की,अतुल चे पप्पा नवोदय विद्यालयात गेले आहेत. तिथे त्यांनी अतुल चा फॉर्म घेतला आहे. त्यांनीच विराटला फोन कर म्हणून सांगितले. म्हणून तुम्हाला फोन केला आहे. विराटच्या पप्पांनी त्यांच्याकडून अतुलच्या पप्पाचा मोबाईल नंबर घेतला. त्यांनी तो मोबाईल नंबर दिला. विराटच्या पप्पांनी अतुल च्या पप्पांना फोन लावला. त्यावेळी त्यांनी सांगितले की, मी इकडे माझ्या शाळेच्या कामानिमित्त आलो होतो म्हणून नवोदय विद्यालयातही आलो आहे. तर त्यांनी मला फॉर्म दिला आहे मी त्यांना विराटचा फॉर्म मागितला परंतु त्यांनी माझ्याजवळ दिला नाही. त्यांनाच तुम्ही पाठवून फॉर्म घेण्यासाठी सांगा असे सांगितले. माझ्याकडे तुमचा नंबर नव्हता घरच्या मोबाईल मध्ये होता म्हणून तुम्हाला फोन करायला सांगितले. विराटच्या पप्पांनी त्यांचे धन्यवाद मानले व उद्या फॉर्म आणण्यासाठी जातो म्हणून अतुलच्या पप्पाला सांगितले. दुसऱ्या दिवशी विराट चे पप्पा फॉर्म आणण्यासाठी नवोदय विद्यालयात जाणार होते. विराटच्या मम्मीने मलाही येऊ द्या आपण सगळे ती शाळा बघू म्हणून सांगितले. त्यामुळे विराटचे पप्पा सगळ्यांना सोबत घेऊन नवोदय विद्यालयात फॉर्म आणण्यासाठी गेले. फॉर्म साठी विराटने व विराटच्या पप्पांनी तिथे नवोदय विद्यालयाच्या कार्यालयात चौकशी केली. त्यांनी थोड्या वेळाने या म्हणून सांगितले.तिथे नोटीस बोर्डवर लावलेल्या नावाची यादी पाहिली. फॉर्म घेण्यासाठी वेळ होता. त्यामुळे नवोदय विद्यालयाची शाळा, होस्टेल, जेवणाची मेस, खेळाचे ग्राउंड व इतर परिसर सगळ्यांनी पाहून घेतला. सुट्ट्या असल्यामुळे होस्टेल,मेस बंद होती. इमारत देखणी दिसत होती.  डोंगर माथ्यावर असल्यामुळे व तेथील परिसर डोळ्याला आनंदित करीत होता. **क्रमश :**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं  ए -३२,  छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# फडणवीस यांच्या उपस्थितीत गडचिरोली महा मॅरेथॉन

## १३ हजारांहुन अधिक युवक - युवती व नागरिकांचा सहभाग

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** पोलीस दलाच्या वतीने एक धाव आदिवासी विकासासाठी या संकल्पनेतून पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांच्या मार्गदर्शनाखाली आज ०४ फेब्रुवारी २०२४ रोजी जिल्हा परिषद मैदानावर भव्य महा मॅरेथॉन २०२४ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या गडचिरोली महा मॅरेथॉन स्पर्धेचे उद्घाटन देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री म.रा. यांच्या हस्ते तसेच धर्मरावबाबा आत्राम, अन्न व औषध प्रशासन मंत्री म.रा., अशोक नेते खासदार गडचिरोली-चिमुर लोकसभा क्षेत्र, देवराव होळी विधानसभा सदस्य गडचिरोली, कृष्णा गजबे विधानसभा सदस्य आरमोरी, विशेष पोलीस महानिरीक्षक नक्षल विरोधी अभियान नागपूर संदिप पाटील, जिल्हाधिकारी संजय मीणा, मुख्य कार्यकारी अधिकारी गडचिरोली आयुशी सिंह, न्यायाधिश आर.आर. पाटील, वनसंरक्षक गडचिरोली किशोर मानकर, आर.एस. बाळापूरकर कमान्डट ९ बटा. केरिपूबल, एम.एच. खोब्रागडे कमान्डट ३७ बटा. केरिपूबल व उप-वनसंरक्षक आल्लापल्ली राहुल एस. तोलीया इ. मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडले. यासोबतच ०३ फेब्रवारी २०२४ रोजी सायं ०६.०० ते १०.०० वाजता दरम्यान गडचिरोली महोत्सव अंतर्गत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करुन गडचिरोली महोत्सवाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमात देखील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत मान्यावरांनी सांस्कृतीक कार्यक्रमाचे आस्वाद घेतला. यावेळी महोत्सवात अयोजित जिल्हास्तरीय कबड्डी, व्हॉलीबॉल व रेला नृत्य स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख बक्षीस, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. तसेच सदर महोत्सवात लावण्यात आलेल्या विविध स्टॉलच्या माध्यमातुन जवळपास २५ ते ३० लाख रुपयाची आर्थिक उलाढाल झाली. या कार्यक्रमात महाराष्ट्राचे प्रसिध्द कलाकार सहभागी झाले त्यामध्ये गौरव मोरे, शिवाली परब, रवींद्र खोमणे, संज्योती जगदाळे, प्रथमेश माने, अपेक्षा लोंढे, आर.जे. आरव व आर.जे. भावना सह गडचिरोली मधील स्थानिक कलाकारांनी सुध्दा सहभाग घेवुन उत्तम कलांचे सादरीकरण केले.



आज झालेल्या स्पर्धेमध्ये स्पर्धकांचा उत्साह द्विगुणीत व्हावा याकरीता देवेंद्र फडणवीस सोबत ईतर मान्यवरांनी या महामॅरेथॉन मध्ये प्रत्यक्ष भाग घेवुन मॅरेथॉन पुर्ण केली आहे. ही महा मॅरेथॉन स्पर्धा ३ कि.मी., ५ कि.मी., १० कि.मी. व २१ कि.मी. अशा वेगवेगळ्या चार प्रकारात घेण्यात आली व प्रत्येक प्रकारात पुरुष गट, महिला गट असे गटनिहाय प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक देण्यात आले. ३ कि.मी. स्पर्धेत पुरुष गटात प्रथम- यश भांडेकर गडचिरोली, द्वितीय- गणेश नैताम कुरखेडा व तृतीय- कपील कुमरे कुरखेडा तसेच महिला गटात प्रथम- अर्चना मट्टामी भामरागड, द्वितीय- रंजु दुर्वा व तृतीय- ज्योती कोवासे यांनी क्रमांक पटकावला असुन विजेत्यांना अनुक्रमे ११ हजार, ७ हजार व ५ हजार रु. रोख, ट्रॉफी, पदक व प्रमाणपत्र, ५ कि.मी. स्पर्धेत पुरुष गटात प्रथम- सुरज बोटरे घोट, द्वितीय- अक्षय पारधी कुरखेडा व तृतीय- केतन कुमरे कुरखेडा तसेच महिला गटात प्रथम- निकीता मडावी अहेरी, द्वितीय- अंकिता मडावी अहेरी व तृतीय- स्नेहल रोडे गडचिरोली यांनी क्रमांक पटकावला असुन विजेत्यांना अनुक्रमे १५ हजार, ११ हजार व ८ हजार रु. रोख, ट्रॉफी, पदक व प्रमाणपत्र, १० कि.मी. स्पर्धेत पुरुष गटात प्रथम- संपतराव ईष्टाम पेरमीली, द्वितीय- विक्की चलाख घोट व तृतीय- अक्षय देवतळे चामोर्शी तसेच महिला गटात प्रथम- दिक्षा तिजारे आरमोरी, द्वितीय- दिक्षा चौके आरमोरी व तृतीय- अमीशा घाटूरकर आरमोरी यांनी क्रमांक पटकवला असुन विजेत्यांना अनुक्रमे १ हजार, १५ हजार व ११ हजार रु. रोख, ट्रॉफी, पदक व प्रमाणपत्र व २१ कि.मी. स्पर्धेत पुरष गटात प्रथम- नागेश्वर रस्से चामोर्शी, द्वितीय- प्रकाश मिरी कुरखेडा व तृतीय- रोशन बोधलकर चामोर्शी तसेच महिला गटात प्रथम- प्रियंका ओक्सा लाहेरी, द्वितीय- मनीषा वड्डे भामरागड व तृतीय- रोहीनी जुवारे आरमोरी यांनी क्रमांक पटकावला असुन विजेत्यांना अनुक्रमे ५१ हजार, ३१ हजार व २१ हजार रु. रोख, ट्रॉफी, पदक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच जेष्ठ नागरिकांना प्रोत्साहनपर बक्षीस वितरीत करण्यात आले. सकाळी ०६.०० वा. मॅरेथॉन स्पर्धा सुरु होऊन सकाळी ९.०० वा. सांगता करण्यात आली. महामॅरेथॉन स्पर्धेत सहभागी सर्व स्पर्धकांना टी-शर्ट, हुडी बॅग, पदक व सहभागीतेचे प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी स्पर्धकांचा उत्साह वाढावा यासाठी झुंबा डान्स, डीजेची सोय करण्यात आली होती. तसेच या स्पर्धेचे थेट प्रक्षेपण गडचिरोली पोलीस दलाच्या अधिकृत युट्युब चॅनेलवर करण्यात आले. सदर महा मॅरेथॉन स्पर्धेसाठी प्रायोजक म्हणुन मायाश्री ग्रुप ऑफ इंडस्ट्रिज वडसा, लॉयड्स मेटल्स सुरजागड, डायरेक्टरेट सोलरीस नागपुर, अजयदिप कंन्स्ट्रक्शन, एसबीआय बँक गडचिरोली, जिल्हा नागरी सहकारी बँक गडचिरोली, सुरजागड ईस्पात एटापल्ली, कल्पना हॉस्पीटल वडसा, डेगानी विशाल राईस मिल वडसा, आश्रय आस्था गडचिरोली, ॲक्सीस बँक गडचिरोली, एल.आय.सी. गडचिरोली, गुरुबक्षाणी कन्सट्रक्शन गडचिरोली, डोंगरवार प्लांट गडचिरोली, लक्ष्मी राईस मील गडचिरोली व किसनराव खोब्रागडे सोसायटी आरमोरी यांनी हातभार लावून मोलाचा वाटा उचलला. सदर स्पर्धा ही जिल्हा परिषद मैदानापासून सुरु होऊन चंद्रपूर रोडवरील आयटीआय चौक, रिलायंस पेट्रोलपंप, कारगील चौक, इंदिरागांधी चौक, ट्रेंड्स मॉल, बोधली चौक पासुन परत जिल्हा परिषद मैदान या मार्गे घेण्यात आली.



# भोपाळ येथील लोकरंग कार्यक्रमात भरला जालन्याच्या पोतराजांनी रंग

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** 26 जानेवारी ते 30 जानेवारी दरम्यान देशाची सांस्कृतिक आणि साहित्यिक राजधानी भोपाळ रवींद्र भवन येथे 39 व्या लोकरंग कार्यक्रमाचे आयोजन संस्कृती विभाग आणि जनजाती बोली भाषा विकास अकादमी भोपाळ वतीने करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन 26 जानेवारी रोजी मुख्यमंत्री श्री मोहन यादव आणि राज्यपाल महोदय यांच्या शुभहस्ते करण्यात आले. राजस्थान, छत्तीसगड, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, आसाम ,जम्मू कश्मीर, महाराष्ट्र ,कर्नाटक ,आंध्र प्रदेश, तमिळनाडू, ओरिसा तसेच विदेशातील काही कलाकारांनाही यात सहभाग नोंदविला होता. नृत्य लोकनृत्य ,लोकवाद्य, गायन चित्रकारी आदि विविध कलाप्रकारांचा यात सहभाग होता. या लोकरंग कार्यक्रमात लोकसाहित्याचे विद्वान डॉ श्रीकृष्ण काकडे( अकोला),डॉ. विटोरे कन्नूलाल यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्राचा संघ सहभागी झाला होता. जालना जिल्ह्यातील पोतराजांनी आपल्या पारंपरिक गायन,वादन आणि नृत्याने लोकरंग कार्यक्रमात रंग भरला लोक कलाकर जालना येथील पोतराज श्री विलास पाटोळे आणि घनसावंगी येथील पोतराज श्री रणजीत विठ्ठल लोंढे या दोघांनी राष्ट्रीय मंचावरती महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत सुंदर,गायन,वादन आणि नृत्य प्रस्तुत करत पारंपरिक लोक कलेची चुणूक दाखवत सर्वांची मने जिंकली.तसेच "जोगी डेरा" महाराष्ट्राच्या मसणजोगी या पारंपरिक लोक कलाकार ठिकाणी लावण्यात आला होता. सारंगी वादन,गायन,शंख,तुणतुणं आणि पारंपरिक गायन आणि जोगी डेरा माध्यमातून त्यांचे जीवन प्रस्तुत केले.या महाराष्ट्रातील सर्व लोक कलाकारांना जनजातीय लोककला आणि बोली विकास अकादमी भोपाल चे डायरेक्टर डॉ. धर्मेंद्र पारे यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्राची लोककला राष्ट्रीय मंचावर सादर झाली .यावेळी त्यांनी महाराष्ट्राच्या सर्व कलाकारांचे स्वागत केले. मध्य प्रदेश संस्कृती विभागाच्या वतीने देशातील लोककलेला प्रश्रय मिळत असून यामुळे महाराष्ट्रातील ग्रामीण लोक कलाकारांना त्या माध्यमातून ही लोककला जिवंत राहण्यास मदत मिळत आहे. महाराष्ट्राच्या या टीम सोबत मार्गदर्शक समन्वयक म्हणून मॉडेल कॉलेज घनसावंगी चे हिंदी विभाग प्रमुख डॉ कन्नूलाल विटोरे यांनी भूमिका बजावली. याबद्दल सहभागी सर्व कलावंतांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# महामोर्चात सहभागी होण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महाराष्ट्र शासनाने 27 डिसेंबर 2023 व 26 जानेवारी 2024 रोजी घेतलेल्या निर्णयामुळे जात वैधता प्रमाणपत्र मिळण्याच्या अटी शिथिल झाल्या आहेत. यामुळे ओबीसी, एससी, एसटी, एनटी, व्ही.जे,एसबीसी प्रवर्गात बोगस लोकांची घुसखोरी होण्याची शक्यता आहे. या निर्णयाविरोधात 7 फेब्रुवारी 2024 रोज बुधवारला चंद्रपूर येथे गांधी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या महामोर्चात गडचिरोली जिल्ह्यातील ओबीसी, एससी, एसटी, एनटी, व्ही.जे., एसबीसी प्रवर्गातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे उपाध्यक्ष प्रा. शेषराव येलेकर, जिल्हाध्यक्ष दादाजी चूधरी, उपाध्यक्ष पांडुरंग घोटेकर, सचिव प्रा. देवानंद कामडी, कोषाध्यक्ष डॉ. सुरेश लडके, जिल्हा संघटक सुरेश भांडेकर, चंद्रकांत शिवणकर ,युवा जिल्हाध्यक्ष राहुल भांडेकर, महिला जिल्हाध्यक्ष संगीता नवघडे, महिला संघटक सुधा चौधरी, मंगला कारेकर आदींनी केले आहे. राज्य शासनाने मराठा आरक्षणासंदर्भात सगेसोयरे या शब्दाची व्याख्या बदलून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब 26 जानेवारी 2024 नुसार मसुदा काढला आहे. हा मसुदा आरक्षण मिळणाऱ्या सर्वच प्रवर्गातील नागरिकांसाठी भविष्यात धोकादायक ठरू शकतो. त्यामुळे ओबीसी, एससी, एसटी, एनटी, व्ही. जे.,एसबीसी प्रवर्गातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. शिंदे समिती ही घटनात्मक नसताना तिच्या शिफारशीवरून कुणबी प्रमाणपत्र देणेही घटनाबाह्य आहे शासनाच्या या अन्यायकारक भूमिकेचा विरोध करण्यासाठी तसेच 27 डिसेंबर 2023 चे राजपत्र रद्द करणे व ओबीसी, एससी, एसटी, एनटी, व्ही. जे,एसबीसी सोबत सर्व समाजाची जात निहाय जनगणना करणे या मागण्यांसाठी चंद्रपूर येथे 7 फेब्रुवारी रोज बुधवारला दुपारी 12 वाजता गांधी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा धडकणार आहे. महाराष्ट्र अनुसूचित जाती अनुसूचित जमाती विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागास व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे नियम अधिनियम 2000 मध्ये बदल करण्यासाठी सरकारने राजपत्र काढले असून त्यामुळे प्रमाणपत्र मिळण्यात बोगसगिरी होण्याचे प्रमाण वाढू शकते त्यामुळे राजपत्र रद्द करावे आणि सर्व जातींची जातनिहाय करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.




# प्रा. तांबेंनी स्व-खर्चाने केला शासन योजनांचा प्रसार

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** 'सारथी' संस्थेच्या पुढाकाराने संशोधक प्रा. रामेश्वर तांबे पाटील यांनी सारथीसह महाज्योती,बार्टी,अमृत,आदिवासीसह विविध शासकीय योजनेचा गेल्या तीन महिन्यांपासुन शेवगाव तालुक्यातील सर्व विद्यालयातुन स्व-खर्चाने प्रचार व प्रसार करत असुन या उपक्रमातुन माहिती मिळाल्याने तालुक्यातील २० विद्यार्थ्यांना 'महाज्योती'मार्फत मोफत टॅब मिळाल्याची बाब गौरवास्पद असल्याचे शेवगाव गट शिक्षणाधिकारी यांनी वरिष्ठांना दिलेल्या अहवालात म्हंटले आहे.एकंदरीतच शासन योजनांचा विद्यालयातुन प्रसार करण्याचा हा प्रयोग राज्यात प्रथमच राबविल्याचे प्रशासकीय पातळीवर कौतुक होत आहे.प्रा. रामेश्वर तांबे यांनी १५ ऑगस्ट रोजी घेतलेल्या मराठा समाजासाठी विविध उपक्रम राबवत असलेल्या 'सारथी'च्या योजनांच्या प्रसार कार्यक्रमांतर्गतच्या 'चावडी वाचन' उपक्रमावेळी शेवगावच्या रेसिडेंशियल विद्यालयात उपस्थित पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजेश कदम,गट शिक्षणाधिकारी तृप्ती कोलते यांनी तालुकाभर हा कार्यक्रम घेण्याचे सुचित केले.त्यानुसार 'सारथी'चे संशोधक प्रा. रामेश्वर लक्ष्मण तांबे पाटील यांनी स्व- खर्चाने संबंध तालुक्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये तसेच ग्रामसभा,मुख्याध्यापक, शिक्षकांच्या प्रशासकीय बैठकीप्रसंगी गेल्या तीन महिन्यांपासुन 'सारथी'च्या योजनांच्या माहितीपर कार्यशाळा यशस्वीपणे घेतल्या. जनजागृती झाल्याने विद्यार्थी व त्यांच्या पालकांपर्यंत माहिती मिळून ते सजग झाल्याचे दिसते आहे.

# इजा-बिजा-तिजा सरकार महाराष्ट्राला उद्धवस्त करेल

## वडेट्टीवार : कोल्डवॉरची जागा शस्त्रांनी घेतली शस्त्रांची जाग बॉम्ब घेतील

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज, फुले-शाहू-आंबेडकरांचा आणि संत महात्म्यांचा महाराष्ट्र, अशी आपल्या राज्याची ओळख आहे. परंतु गेल्या दोन वर्षात घोटाळेबाजांचा, वसुलीचा, खोकेबाजांचा, पक्ष फोडोफोडीचा, गुंडांना राजाश्रय देणारा महाराष्ट्र, अशी राज्याची नवी ओळख करण्यात शिंदे सरकारने मोठी प्रगती केली असल्याचा जोरदार हल्लाबोल विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. त्याचबरोबर भाजप आमदाराने पोलीस ठाण्यात केलेल्या गोळीबारामुळे, या गोळीबारानंतर भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी मुख्यमंत्र्यांवर केलेल्या गंभीर आरोपांमुळे सुसंस्कृत महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेली असून राज्याच्या आदर्श राजकीय परंपरेला काळीमा फासला



आहे. अशी संतप्त प्रतिक्रीया वडेट्टीवार यांनी आज दिली आहे.
मुंबई येथील प्रचितगड या शासकीय निवासस्थानी आयोजित पत्रकार परिषदेत वडेट्टीवार बोलत होते. वडेट्टीवार म्हणाले की,भाजपाचे आमदार गणपत गायकवाड यांनी पोलीस ठाण्यात शिवसेना (शिंदे गट) शहर प्रमुखावर गोळीबार केला. यानंतर आमदार गायकवाड यांनी मुख्यमंत्र्यांच्या काळात गुन्हेगारी वाढत आहे. भ्रष्टाचार बोकाळला असल्याची प्रतिक्रिया दिली. गायकवाडांच्या आरोपांना मुख्यमंत्र्याच्या पुत्राने पुष्टी दिली. कुख्यात गुंड हेमंत दाभेकरने चक्क वर्षा निवासस्थानी जावून मुख्यंत्र्यांच्या पुत्राची भेट घेतली. याचा अर्थ महाराष्ट्रात गुंडाराज सुरू आहे. याच मुख्यमंत्र्यांच्या काळात वर्षा निवासस्थानावर ड्रग प्रकरणातील आरोपीने गणपतीची आरती केली होती. वर्षा निवासस्थान हे गुंडांचे आश्रयस्थान झाले आहे का? हा खरा प्रश्न आहे. या आगोदर शिंदे गटातील आमदार पुत्राने बिल्डरचे अपहरण करून बंदुकीचा धाक दाखवत मारहाण केली होती. उपमुख्यंत्र्यांच्या पुत्राने गंभीर आरोप असलेल्या गजा मारणेची भेट घेतली होती. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची मुलं गुंडांची पक्षात भरती करत आहेत. महाराष्ट्राला हे इजा-बिजा-तिजा उद्धवस्थ करायला निघाले आहेत. त्यामुळे कुठे नेऊन ठेवलाय महाराष्ट्र, असा प्रश्न जनता विचारत आहे.
वडेट्टीवार म्हणाले की, या सरकारने पोलसेले गुंड कंत्राटदारांना धमकावत आहेत. याबाबत कंत्राटदार संघटनांनी इतिहासात पहिल्यांदा तक्रार केली आहे. शासनाची विकासकामे राजाश्रय असलेल्या गुंडांकडून बंद पाडली जात आहेत. दडपशाही करणे, जिवानिशी मारहाण करणे, पैशाची मागणी करणे असा, एक कलमी कार्यक्रम सध्या सुरू आहे. गुंडगिरीमुळे आता विकासाला खिळ बसण्याची शक्यता असून खोके सरकारकडून राजरोस वसुली सुरू असल्याचा आरोप कंत्राटदारांनी केला आहे. त्यामुळे या सरकारचे वसुली सरकार असे नामकरण केले पाहिजे. अशी खरमरीत टीका वडेट्टीवार यांनी केली आहे. या सरकारच्या काळात राजाश्रय मिळालेली अधिकारी मस्तावले आहेत. अजिंठा वेरूळ येथील कार्यक्रमात मा. उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तींना या अधिकाऱ्यांनी अपमानास्पद वागणूक दिली. ज्या राज्यात मा.न्यायमूर्तींना अपमानास्पद वागणूक दिली जात असेल तर सामान्य जनतेला हे मस्तवाल अधिकारी कशा प्रकारची वागणूक देत असतील याचा विचार न केलेला बरा. गुंडांना राजाश्रय देणाऱ्या, भ्रष्टाचाराला खतपाणी घालणाऱ्या, मुजोर अधिकाऱ्यांचे लाड पुरविणाऱ्या, सरकारचे डोके ठिकाणावर आहे का? असा प्रश्न जनता या सरकारला विचारत आहे.
सत्ताधारी इजा-बिजा-तिजा यांच्यामध्ये कोल्डवॉर सुरू असल्याचे आम्ही यापूर्वीदेखील सांगितले आहे. आता या कोल्डवॉरची जागा शस्त्रांनी घेतली आहे. काही दिवसांनी यांची मजल एकमेकांवर बॉम्ब फेकण्यापर्यंत जाणार आहे. इतकी सत्तेची लालसा, हव्यास या इजा-बिजा-तिजा मध्ये भरली आहे. अशा शब्दात श्री. वडेट्टीवार यांनी सरकारला धारेवर धरले.

## शिवजयंती अध्यक्षपदी संदीप गौड यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** येथील सार्वजनिक शिवजयंती महोत्सव



समितीच्या अध्यक्षपदी यूवा कार्यकर्ते संदीप पाटील गौड तर सचिव म्हणून आंनद डांगे याची एकमताने निवड करण्यात आली आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही शहरात सार्वजनिक शिवजयंती महोत्सव साजरा करण्यासाठी सर्व पक्षीय बैठक आयोजित करण्यात आली.यावेळी विविध सामाजिक उपक्रम घेऊन मोठ्या प्रमाणात जयंती साजरी करण्याचे निश्चित करण्यात आले आहे.बैठकीत एकमताने नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.अध्यक्ष संदीप पाटील गौड, उपाध्यक्ष दीपक निळकंठ वर्षेवार, मोहन राठोड, सचिव आनंद डांगे, सहसचिव माधव बोरगांवकर, कोषाध्यक्ष विजय पवार, प्रसिद्धी प्रमुख आदिनाथ चिंताकुठे, अनिल डोईफोडे यांची निवड करण्यात आली आहे. बैठकीस नागनाथ घिसेवाड, नामदेव आयलवाड, गोविंद बाबा गौड पाटील, डॉ.यू.एल.जाधव, शिवाजी पांचाळ, माधव अमृतवाड,सुरेश बिल्लेवाड, शेखर कूंठे, गणपत पीठ्ठेवाड ,निळकंठ वर्षेवार, डॉ.राम नाईक, केशव मूदेवाड, सतीश देशमुख, सीताराम मेटकर, दिलीप सोनवडे, बाळु मेटकर, दिलीप तिवारी,दता पांचाळ, बी.आर.पांचाळ, अंकुश रतनवार, व्यंकट मेकटकर, दिपक मेटकर, पांडुरंग वर्षेवार, सुभाष नाईक, कृष्णा पाटील,लालू धोत्रे, संतोष आणेराय, बाळासाहेब देवकर, दत्ता बोईनवाड यांची उपस्थिती होती.

## पैठण शहरात मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न



आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** छत्रपती संभाजीनगर माहेश्वरी सभा,बालाजी नगर प्रभाग तथा पैठण तालुका माहेश्वरी सभा यांच्या संयुक्त विद्यमाने आज पैठण शहरात मोफत नेत्र तपासणी शिबीर घेण्यात आले.

या शिबिरात एकूण 100 जणांची तपासणी झाली. छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिध्द दृष्टी आय इन्स्टिट्यूटचे डॉ जगदिश लोया यांनी रुग्णाची नेत्र तपासणी केली. कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती म्हणून लाभलेले छत्रपती संभाजीनगरचे अन्न व औषधी प्रशासन सहाय्यक आयुक्त रोजगोपाल बजाज यांनी सुद्धा आपल्या भाषणात नेत्र तपासणी कार्यक्रमाचे आयोजन केल्या बद्दल पैठण सभेचे कौतुक केले व अजून पूढे मोठ्या प्रमाणात आपण, असे सामाजिक कार्यक्रम समाजासाठी राबवा असे आवाहन सुद्धा त्यांनी केले.

कार्यक्रमासाठी जिल्हा माहेश्वरी सभेचे अध्यक्ष श्यामसुंदर सोमाणी, सचिव अजित नावंदर, बालाजी नगर प्रभाग प्रमुख सतीश लोहिया, नंदलाल लाहोटी, सचिन लखोटिया,पैठण माहेश्वरी सभेचे अध्यक्ष पवन लोहिया, सचिव जगदिश नागोरी, सुनिल बलदवा, भूषण मालपाणी, सौ.मनिषा तोतला, सौ.सुजाता मालानी, जुगलकिशोर लोहिया,उमेश बाहेती, संजय सारडा, श्यामसुंदर लोहिया, संतोष मालपाणी, नाथप्रसाद पोरवाल, प्रकाश लोहिया यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कैलास बलदवा, आनंद लोहिया, राधेश्याम तोष्णीवाल, अमित सोमाणी, अजय पोरवाल, राज मानधने, महेश बजाज, गोपाल लखोटीया,कुलदीप पोरवाल, योगेश लोहिया, जगदिश लोहिया आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेश मानधने यांनी तर आभार प्रदर्शन तालुका अध्यक्ष पवन लोहिया यांनी केले.

## सोशल मीडियाने पिढी आत्मकेंद्रित बनवली : प्राचार्य नारायण कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे कै. लक्ष्मणराव भीमराव कोलते पाटील कला वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय व छत्रपती शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व्हावी म्हणून एक दिवसीय कायदेविषयक शिबिर आयोजित करण्यात आले होते.या शिबिरासाठी फरदापुर पोलीस स्टेशनचे सहा पोलीस निरीक्षक प्रफुल साबळे व बिट जमादार मिरखॉं तडवी शिबिराचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मनुष्य हा समाजशील आहे समाजातच जीवन व्यतीत करने त्याला आवडते परंतु सोशल मीडियाच्या अति वापराने तो स्वतःचाच विचार करणारा




आत्मकेंद्रित बनल्याचे मत प्राचार्य नारायण कोलते पाटील यांनी व्यक्त केले.एक दिवशीय कायदेशीर आयोजित आधुनिक माध्यमे आणि युवकांसमोरील सामाजिक व सांस्कृतिक आव्हाने या विषयावर आयोजित यावेळी मंचावर सचिव रत्नाताई कोलते पाटील, संस्थाचे अध्यक्ष भाऊराव कोलते पाटील,प्राचार्य नारायण कोलते पाटील, प्राध्यापक जीवन कोलते पाटील आदि उपस्थित होते. प्रास्ताविकात चर्चासत्राचे समन्वयक प्राचार्य पंजाबराव कोलते पाटील यांनी या चर्चासत्राच्या आयोजनाची भूमिका स्पष्ट केली पुढे प्रा.जीवन कोलते पाटील यांनी युवकांच्या अति सोशल मीडिया वापराचे दुष्परिणाम विशद करून नवीन पीढीचा कल हा वाचण्यापेक्षा चित्र बघण्याकडे अधिक असून ते धोकादायक फॅक्ट चेकर डॉ.प्रा.प्रविण सरकटे यांनी व्हॉट्स ॲप, फेसबुक, ट्युटर, इन्स्टाग्राम, यु-ट्युब यांनी युवकांना त्यांच्या हातातील बाहुले बनविले असून नकळत आपला वापर यांच्याकडून च्याकडून होत असल्याचे विविध उदाहरणांसह स्पष्ट केले. त्याचबरोबर त्यांनी या माध्यमातुन मिळालेल्या माहितीव्री सत्यता पडताळून पाहण्याचे विविध मार्ग सांगितले. फरक सांगून आधुनिक माध्यमे लोकांना कशाप्रकारे गोंधळून टाकते यांचे विविध दाखले त्यांनी दिले. तर डॉ.व्हि.पी.राजपूत यांनी आजच्या माध्यमांचा वापर संविधानावर नियंत्रण ठेवण्यासाठी केला जात असून ते धोकादायक असल्याचे स्पष्ट केले तसेच माध्यमांनी लोकशाही, संविधान यांच्या संरक्षणासाठीची भूमिका निभवावीअसे आवाहन त्यांनी केले.

## खोटे शिक्के तयार करून कोर्टालाच फसविले

आधुनिक केसरी न्यूज

**वर्धा :** फसवणूक केली म्हणून कोर्टात धाव घेतली जाते. पण आता तर चक्क कोर्टाचीच फसवणूक करण्यात आल्याने पोलीस तक्रार झाली आहे. जिल्हा व सत्र न्यायालय वर्धा, असा खोटा शिक्का आरोपी बाबाराव शेंडे याने तयार करीत सूचनापत्र बनविले. त्यावर न्यायालय सहाय्यक अधीक्षकांची बनावट स्वाक्षरी केली. ते पत्र मग पाकिटात टाकून पोस्टाने इतरांना पाठविल्याचा हा धक्कादायक प्रकार आहे. न्यायालयाने चौकशी केल्यावर हा फसवणूकीचा प्रकार उजेडात आला. जिल्हा व सत्र न्यायालयात ११ जुलै २०२२ रोजी एक प्रकरण पटलावर होते. मात्र न्यायाधीशांनी शरद खापर्डे व अन्य दोघांविरोधात नोटीस काढण्यासाठी आदेश दिलेला नव्हता. हे प्रकरण अर्जदाराच्या सुनावणीसाठी २८ जुलै २०२२ पर्यंत तहकूब करण्यात आले होते. तरीही आरोपी बाबाराव शेंडे याने संबंधित व्यक्तीविरोधात बनावट सूचनापत्र तयार केले. ते पत्र सरकारी पाकिटात खोटा शिक्का मारून खापर्डे यास पाठविले. त्या पत्रात शरद खापर्डे याने न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांच्या समक्ष २८ जुलै २०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर रहावे, असा खोटा व दिशाभूल करणारा मजकूर होता. तसेच नोटीस देण्याच्या तारखेत खाडाखोड करून शरद खापर्डे यांना दबावात आणण्याची ही बाब ठरली. बनावट शिक्के असल्याची बाब उजेडात आल्यावर न्यायालयाने चौकशीचे आदेश दिले. त्यात आरोपीने सूचनापत्र, न्यायालयीन रबरी मोहर आदी बनावट तयार केल्याचे स्पष्ट झाले. या बनावट साहित्याचा उपयोग आरोपीने स्वतःच्या लाभासाठी केल्याचे दिसून आले. त्यामुळे न्यायालयाने आरोपीविरोधात पोलीस तक्रार करण्याची सूचना केली.



# फळ बागायतदार शेतकऱ्यांना केव्हीकेमार्फत संपूर्ण सहकार्य केले जाईल : मा.खा. अनंतराव देशमुख

आधुनिक केसरी न्यूज

वसंत पाटील
वाशिम : सुविदे फाऊंडेशन कृषि विज्ञान केंद्र वाशिम अंतर्गत जिल्हयात संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची संख्या लक्षणीय वाढत आहे. बहुतांश शेतकरी मृग बहार संत्र्याचे उत्कृष्ट उत्पादन घेत आहेत. अशा बागायतदार शेतकऱ्यांना भविष्यात प्रक्रिया केंद्र व विक्री व्यवस्थापन बाबत पर्यायी व्यवस्था उभारणीसाठी कृषि विज्ञान केंद्राकडून संपूर्ण सहकार्य केले जाईल. असे प्रतिपादन मा.खा. अनंतराव देशमुख यांनी व्यक्त केले आहे. मृग बहार संत्रा तोडणीचे पुजन तालुक्यातील वडजी येथे त्यांच्या हस्ते करण्यात आले. त्या अनुषंगाने देशमुख बोलत होते.  सुविदे फॉऊंडेशन कृषि विज्ञान केंद्र, वाशिम च्या अंतर्गत सुरू असलेल्या संत्रा गट शेती उपक्रमांअतर्गत सुरू असलेल्या मोहिमे द्वारे जिल्ह्यात संत्रा पिकाचे मोठ्या प्रमाणात क्षेत्र वाढत असून बहुतांश शेतकरी मृग बहारा चे उत्कृष्ट उत्पादन घेत असून या बहाराची फळ तोंडणी हंगाम सुरू झाला आहे. कृषि विज्ञान केंद्र द्वारे दत्तक गाव वडजी, तालुका रिसोड जिल्हा वाशिम येथील संत्रा फळ तोंडणी हंगामची सुरवात संस्थेचे अध्यक्ष तथा मा. खा. श्री. अनंतराव देशमुख यांच्या हस्ते नुकतेच पूजन करून करण्यात आले आहे.

प्राथमिक स्वरूपात अमित विलास बोरकर व शिवाजी शेजुळ यांच्या बागेत फळ तोंडणीचे पूजन श्री अनंतराव देशमुख यांच्या हस्ते पार पडले. यावेळी श्री अनंतराव देशमुख यांनी वडजी गावातील संत्राबागा व फळांची गुणवत्ता अत्यंत उत्कृष्ट असून उच्चतम उत्पादन अपेक्षित असल्याबद्दल त्यांनी शेतकऱ्यांचे कौतुक व अभिनंदन केले व पुढील काळात प्रक्रिया केंद्र



व विक्री व्यवस्थापणा बाबत पर्यायी व्यवस्था उभारणीसाठी कृषि विज्ञान केंद्राच्या वतीने संपूर्ण सहकार्य केल्या जाईल आश्वासित केले. याप्रसंगी वडजी येथील विलास बोरकर, राजेश बोरकर, शिवाजी शेजुळ, विनोद बोरकर, शिवाजी बोरकर, गजानन बोरकर, प्रदीप पाटील, , सतीश बोरकर, विठ्ठल बाजड, संतोष बाजड अकातराव  बोरकर , शकराव बोरकर अश्रूजी शेजुल प्रदीप बोरकर पो.पा. ,अमित बोरकर  ,शरद कावळे ,अशीतोष बोरकर, नारायण बाजड, गोपाल म बोरकर , डॉ .सुनील बोरकर ,गजानन आ. बोरकर , गोपाल बाजड , सलमान पठाण, रियाज पठाण , शंकर बोरकर ज्ञानेश्वर बोरकर ,अमोल बोरकर ,गणेश साबळे, सतीश चांदूरकर ,केशवराव बोरकर , गणेश बोरकर, विशाल बोरकर, विजय देशमुख, महेंद्र बोरकर , विनोद बोरकर, संदीप बोरकर , राजेश बोरकर, शिवाजी बोरकर , शिवाजी शेजुळ, गजानन शेजुळ ,वैभव शेजुळं, यांच्यासह संत्रा उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यासोबतच गावात अभिनव पद्धतीने सुरू केलेल्या सामूहिक गोशाळेची पाहणी करून या उपक्रमाबद्दल माहिती घेतली व शासकीय व संस्थेच्या स्तरावर संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.



## मच्छिंद्रनाथ चिंचोली येथे रामायणातील लक्ष्मण शक्तीचा ऐतिहासिक सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** तालुक्यातील श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ चिंचोली येथील श्री मच्छिंद्रनाथ देवस्थान याठिकाणी मागील 6 महिन्यांपासून भावार्थ रामायण कथा सुरु असून या रामायणातील अतिशय महत्त्वाच्या युध्दकाण्ड यातील भव्य दिव्य अशा लक्ष्मण शक्तीच्या कार्यक्रमाचे येत्या धर्मनाथ बिज निमित्त दि.10 फेब्रुवारी शनिवार रोजी सायंकाळी ठीक 7 वाजता आयोजन करण्यात आले असून याठिकाणी मच्छिंद्रनाथ  चिंचोली व पंचक्रोशीतील हजारो रामभक्त, वाचक, सूचक व भाविक गण या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होणार असून तरी या भव्य लक्ष्मण शक्तीच्या कार्यक्रमासाठी सर्वांनी आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन मच्छिंद्रनाथ चिंचोली  येथील गावकरी यांनी केले आहे.

दिवशी दि.11 फेब्रुवारी रविवार रोजी सकाळी ठीक 9 ते 11 ह भ प ज्ञानेश्वर माऊली महाराज पठाडे यांचे काल्याचे किर्तन होईल नंतर भव्य महाप्रसादाच्या पंगती सुरु होतील. तरी या अनुषंगाने मच्छिंद्रनाथ चिंचोली येथुन दि.27 जानेवारी 2024 रविवार रोजी या ठिकाणाहून वनवासी मंडळी यांनी 14 दिवसांच्या वनवासासाठी श्रीक्षेत्र. पैठण याकडे प्रस्थान केले आहे. या वनवासी मंडळींना निरोप देण्यासाठी सर्व मच्छिंद्रनाथ चिंचोलकरांनी हजेरी लावत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.दि 10 शनिवारी रोजी 14 दिवसांचा वनवास संपवून श्रीक्षेत्र पैठण या ठिकाणाहून परतलेल्या वनवासी रामभक्तांची बोडखा फाटा येथे दि 10 रोजी भरत भेट सकाळी 10 होईल त्या ठिकाणा ऊण टाळ मृदुंगाच्या गजरात मच्छिंद्रनाथ चिंचोली गावातून शोभायात्रा निघणार आहे. या शोभायात्रेच्या समारोपानंतर लागलीच ज्या क्षणाची हजारो रामभक्त आतुरतेने प्रतिक्षा करत आहेत त्या लक्ष्मण शक्तीच्या भव्य महापर्वाला सायंकाळी ठीक 6 वाजता याठिकाणी सुरुवात होईल.तरी या दोन्ही प्रसंगी म.चिंचोली येथील व पंचक्रोशीतील सर्व रामभक्त, वाचक, सूचक व भाविक भक्त यांनी उपस्थित राहून या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन ग्रामस्थ व तरुण मंडळी यांनी केले आहे.

## राईनपाडा खटल्याचा निकाल घोषित; सात आरोपींना जन्मठेपेची शिक्षा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** संपूर्ण राज्य हादरवून सोडणाऱ्या राईनपाडा हत्याकांडाचा अखेर आज निकाल लागला. पाच भिक्षुकांची हत्याप्रकरणी धुळे न्यायालयाने ७ जणांना दोषी ठरवत त्यांना जन्मठेपेची सजा सुनावली आहे. न्यायमूर्ती एत्त.ए.एम. ख्वाजा यांनी आरोपींना शिक्षा सुनावली आहे.  ह्या निकालाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागून होते. साक्री तालुक्यातील राईनपाडा येथे जमावाने पोरं धरणारी टोळी समजून भारत शंकर भोसले, भरत मावळे, दादाराव भोसले, आगनुक इंगोले, राजू भोसले या गोसावी डावरे समाजातील भिक्षुकांची हत्या केली होती. हे हत्याकांड १ जुलै २०१८ रोजी राईनपाडा ग्रामपंचायत कार्यालयात घडले होते. दरम्यान, या घटनेने संपूर्ण राज्य हादरले होते कौर्याची परिसीमा गाठणाऱ्या या घटनेचा जलद निकाल लागण्याचे आश्वासन तेव्हा सत्ताधाऱ्यांनी दिले होते. मात्र, निकालासाठी तब्बल ६ वर्षांची प्रतीक्षा करावी लागली. अखेरीस सात आरोपींना जन्मठेपेची शिक्षा करण्यात आली. जन्मठेप सुनावलेल्या आरोपीमध्ये महारू ओंकार पवार, दशरथ दसऱ्या पिंपळसे, हिरालाल ढवळ्या गवळी, गुलाब रामा पाडवी, युवराज मणू बौरे, मोतीलाल काशिनाथ साबळे यांचा समावेश आहे. धुळे जिल्हा दंडाधिकारी क्र. १ चे न्यायमूर्ती एस.ए. एम. ख्वाजा यांच्या समोर खटल्याचे कामकाज चालले. यात विशेष सरकारी उज्वल निकम, जिल्हा सरकारी देवेंद्रसिंह तंवर, अ. सरकारी वकील निलेश कलाल यांनी विशेष भूमिका निभावली. तर तपासाधिकारी तत्कालीन डीवायएसपी श्रीकांत घुमरे यांची साक्ष महत्याची ठरली आहे.





## सांघिक खेळांच्या आयोजनामुळे सामाजिक एकोपा

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** अमोना येथे खंडोबा यात्रेनिमित्त कबड्डी च्या सामन्यांचे उदघाटक म्हणुन बोलत असताना राष्ट्रवादी काँगेस पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष गजानन वायाळ पुढे म्हणाले की खेळाच्या संघांमध्ये विविध जाती धर्माचे तरुण एकत्र येतात आणि सांघिक भावना निर्माण होतात. त्यांच्या मधला संवाद वाढतो आणि एक सक्षम पिढी देशाला मिळते.

ग्रामीण भागातील खेळाडूंमधील कला गुण विकसित होण्यास होण्यास मदत होते. आमोना गावामध्ये दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षी सुध्दा खंडोबा यात्रा अतिशय मोठ्या प्रमाणात भरवण्यात आली दिवसभर शंकरपटाचे भव्य आयोजन करण्यात आले आणि सायंकाळी कबड्डी चे सामने खेळल्या गेले ह्यामध्ये जिल्ह्यासह जिल्ह्याच्या बाहेरच्या संघांनी सुध्दा सहभाग घेतला. कार्यक्रमाचे उदघाटन गजानन वायाळ यांनी केले तर प्रमुख पाहुणे म्हणून पप्पूसेठ राजपूत, शिवाजी गाडेकर,विष्णुभाऊ घुबे, गौतम साळवे ARMY, शामभाऊ जाधव,भगवान रक्ताडे सर, दिलीपमामा शितोळे, अंकुश थुट्टे, अक्षय सुरुशे, गोपाल सुरुशे, भागवत सुरुशे, सरपंच प्रल्हाद ईंगळे, लहुभाऊ वानखेडे, शिवदास भांदर्गे, सुनिताताई ईंगळे-पोलीस पाटिल, शालेय व्यवस्थापण समिती जि.प.अमोना, तंटामुक्ती अध्यक्ष-गजानन वाघ,राजुभाऊ जायभाये व गावकरी उपस्थित होते.

## कन्हेरी येथे विविध कामांचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**
**वाशिम :** जिल्ह्यातील भर जहाँगीर सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य अमित पाटील खडसे यांचा विकास कामांचा झंझावात सुरूच आहे. रिसोड तालुक्यातील भर जहाँगीर सर्कल मधील कन्हेरी येथे नुकतेच विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले आहे.

रिसोड तालुक्यातील भर जहाँगीर सर्कलचे जिल्हा परिषद सदस्य अमित बाबाराव पाटील खडसे हे एक लोकाभिमुख लोकप्रतिनिधी म्हणून अल्पावधीतच नावारूपास आलेले कर्तव्यदक्ष व्यक्तिमत्त्व आहे. उच्चविद्याविभूषित असून देखील समाजातील अखेरच्या घटकापर्यंत त्यांची नाळ जुळलेली आहे. परिणामी दिवसागणिक त्यांच्या लोकप्रियतेत वाढ होत आहे. जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आल्यापासून सातत्यपुर्ण पाठपुरावा करत त्यांनी आपल्या सर्कलमध्ये अनेक विकास कामे केली आहेत. आणि तोच झंझावात अव्याहतपणे सुरूच आहे.नुकतेच त्यांनी आपल्या सर्कलमधील कन्हेरी येथे दलीत वस्तीतील सिमेंट रस्त्याचे व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पेव्हर ब्लॉक कामाचे भूमिपूजन केले आहे.

सर्कलमध्ये विकासाची गंगा खेचून आणण्याचे काम अमित पाटील करत आहेत. सर्कल मधील प्रत्येक गावामध्ये विकास करण्यासाठी त्यांचा विशेष भर असतो. शुक्रवारी कनेरी येथे दलित वस्ती सिमेंट रस्ता व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे पेव्हर ब्लॉकच्या भूमिपूजन सोहळा संपन्न झाला. प्रसंगी कनेरी येथील सरपंच उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य सेवा सहकारी सोसायटीचे सदस्य व सर्कल मधील अनेक कार्यकत्यांच्या उपस्थितीमध्ये हा भूमिपूजन सोहळा संपन्न झाला आहे. मी माझ्या संपूर्ण सर्कलमध्ये विकास कामे करण्यावर भर देत असून प्रत्येक गावामध्ये विकास निधी खेचून आणण्यासाठी मी सदैव तत्पर असून, त्यासाठी आपल्या सर्वांच सहकार्य  मला लाभत आहे. सर्व सामान्य जनतेचा आशीर्वाद हिच माझी सर्वात मोठी ताकद आहे. असे भावोद्गार अमित पाटील खडसे  यांनी भूमिपूजन प्रसंगी व्यक्त केले आहेत.



# चारित्र्यावर संशय; पत्नीची आत्महत्या

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** वस्तीत राहणाऱ्या युवकासोबत अनैतिक संबंध असल्याचा आरोप करीत पत्नीच्या चारित्र्यावर वारंवार संशय पती घेत होता. पतीच्या मारहाणीला कंटाळून पत्नीने गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी जरीपटका पोलिसांनी तक्रारीवरून पतीविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक केली. जितेंद्र चोटीराम केशवानी (४०, हुडको कॉलनी, जरीपटका) असे आरोपी पतीचे नाव आहे तर वंशिका (३२) असे मृत महिलेचे नाव आहे. जितेंद्र हा ई-रिक्शा चालवत होता. त्याला दारुचे व्यसन होते. पत्नी वंशिका आणि ८ वर्षाचा मुलगा यांच्यासोबत तो भाड्याने राहत होता. वस्तीतील एका युवकाशी पत्नीचे प्रेमसंबंध असल्याचा संशय पती जितेंद्रला होता. त्याने अनेकदा पत्नीवर संशय घेऊन तिला मारहाण केली. तिचा शारीरिक व मानसिक छळ केला. तो पत्नीसह मुलालाही मारहाण करीत होता. त्यामुळे पतीच्या मारहाणीला पत्नी कंटाळली होती. तिने ३० ऑगस्टला घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. या प्रकरणी वंशिका यांची बहिण हेमा नागपाल यांनी जरीपटका पोलीस ठाण्यात तक्रार दिली. चारित्र्यावर संशय घेऊन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचा गुन्हा पोलिसांनी दाखल केला.

# सीएसएमएसएस आयुर्वेद रुग्णालयाच्या विस्तारित अत्याधूनिक पंचकर्म केंद्राचे पद्माकर मुळे यांच्या हस्ते लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगर कांचनवाडी येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित आयुर्वेद रुग्णालयाच्या विस्तारित नवीन अत्याधूनिक पंचकर्म केंद्राचे श्री. पद्माकर मुळे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

यावेळी श्री. पद्माकर मुळे म्हणाले की, हजारो वर्षांपासूनच्या शाश्वत, प्रभावी अणि उपयुक्त अश्या आयुर्वेदाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी तसेच आयुर्वेदाच्या वैज्ञानिक दृष्टीने सेवा, संशोधन व शिक्षण देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकार आणि आयुष मंत्रालय सातत्याने सकारात्मक कार्य आणि प्रयत्न करत आहेत. आयुर्वेदाच्या वैज्ञानिक दृष्टीने सेवा, संशोधन व शिक्षण देण्याच्या उद्देशाने पंचकर्म वैद्यकीय केंद्राच्या विस्तारामुळे अधिकाधिक रुग्णांना आरोग्य सेवेचा लाभ घेता येणार आहे. या नवीन संकुलात नवीन चेंबर्स बांधण्यात



आल्याची माहिती त्यांनी दिली. या नवीन पंचकर्म वैद्यकीय केंद्राच्या विस्तारामुळे पूर्वी दररोज अनेक रुग्णांना आरोग्य लाभ मिळत होते, आता दररोज सुमारे २५० पेक्षा जास्त रुग्णांना या सुविधेचा लाभ घेता येणार आहे. पंचकर्म ही एक शुद्धिकरण उपचार पद्धती आहे जी शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकून अनेक रोग पूर्णपणे नष्ट करते.

संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख म्हणाले की, आजच्या व्यस्त जीवनात लोकांना त्यांच्या आरोग्याकडे लक्ष देता येत नाही. वातावरण इतके प्रदूषित झाले आहे की, माणूस प्रत्येक श्वासासोबत एक प्रकारचे विष पीत आहे. चरक संहितेत वेगवेगळ्या आजारांनुसार आहार नियोजन आणि सल्ला देण्यात आला आहे. हृदयरोग, मधुमेह, रक्तदाब, कॅन्सर, हाडांचे आजार, पक्षाघात या आजारावर देखील आयुर्वेदाचा उपयोग होतो. अत्याधूनिक पंचकर्म नवीन केंद्र उभारणे ही काळजी गरज आहे, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी संस्थेचे मानव संसाधन अधिकारी श्री. अशोक आहेर, जनसंपर्क अधिकारी श्री. संजय अंबादास पाटील, आयुर्वेद रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. नरेश निंबाळकर, विभाग प्रमुख, परिचारिका, रुग्ण आदी उपस्थित होते.



# उपमुख्यमंत्री फडणवीसांनी खासदारांच्या घरी घेतला स्नेहभोजनाचा आस्वाद

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** राज्याचे उपमुख्यमंत्री, गृहमंत्री आणि गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी रात्री भाजपच्या अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री तथा खासदार अशोक नेते यांच्या निवासस्थानी भेट देऊन स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. यावेळी त्यांनी भाजपच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा करून त्यांना मार्गदर्शन केले. खा. नेते यांनी पुष्पहाराने फटाक्यांच्या आतिषबाजीने आणि कार्यकर्त्यांनी प्रभू श्री. रामाच्या आतिशबाजी करत त्यांचे जलोषात स्वागत केले. यावेळी आ.डॉ. देवराव होळी, भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे, ज्येष्ठ नेते बाबुराव कोहळे,रमेश भुरसे, प्रमोद पिपरे,रविंद्र ओल्लालवार, प्रकाश गेडाम, रेखाताई डोळस, डॉ.शर्मा मॅडम, सदानंद कुथे, योगीता पिपरे, गीताताई हिंगे, अनिल तिडके, प्रणय खुणे,भारत खटी, यांच्यासह इतर ज्येष्ठ पदाधिकारी उपस्थित होते. विविध कार्यक्रमांच्या निमित्ताने उपमुख्यमंत्री फडणवीस शनिवारी गडचिरोलीत मुक्कामी होते. रविवारी जिल्ह्यात विविध कार्यक्रमांना उपस्थित राहून ते नागपूरला रवाना झाले. फडणवीसांची ही गृहभेट आणि पदाधिकाऱ्यांसोबतच्या चर्चेमुळे भाजपच्या पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# खेळातून कर्मचाऱ्यांना ऊर्जा देण्याचा महावितरणचा उपक्रम स्तुत्य : डॉ. कराड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** वीजपुरवठ्याच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेस ऊर्जा देण्याचे काम महावितरण करते. त्याबरोबरच कर्मचाऱ्यांनाही क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून ऊर्जा देण्याचा महावितरणचा उपक्रम स्तुत्य आहे, असे प्रतिपादन केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ.भागवत कराड यांनी केले. महावितरणच्या आंतरपरिमंडलीय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचे पारितोषिक वितरण डॉ.कराड यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महावितरणचे संचालक (मानव संसाधन) अरविंद भादीकर, प्रादेशिक संचालक (पुणे) अंकुश नाळे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी संजय ढोके यांची उपस्थिती होती. यावेळी डॉ.कराड म्हणाले की, विजेचे आपल्या दैनंदिन जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. आज कोणतेही काम विजेशिवाय होत नाही. राज्यातील घराघरात अखंडित वीजपुरवठा देण्यासाठी महावितरणचे कर्मचारी रात्रंदिवस मेहनत घेतात. हे करताना निर्माण होणारा ताणतणाव, थकवा घालवण्यासाठी ही क्रीडा स्पर्धा आयोजित केली. हा महावितरणचा उपक्रम अभिनंदनीय आहे. केंद्र शासन व राज्य सरकारचेही क्रीडा क्षेत्रास प्रोत्साहन देण्याचे धोरण आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडवण्यासाठी महाराष्ट्रात लवकरच क्रीडा विद्यापीठ सुरू होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी ऊर्जा क्षेत्रातही अपारंपरिक वीजनिर्मीतीस प्रोत्साहन देण्यात येत आहे. गरिबांना दरवर्षी 300 युनिट वीज मोफत देण्यासाठी प्रधानमंत्री सूर्योदय  योजनेद्वारे रूफ टॉप सोलर बसवण्यात येणार असल्याचे डॉ.कराड यांनी यावेळी सांगितले. याबरोबरच जायकवाडी धरणाच्या जलाशयावर 1500 मेगावॅट क्षमतेचा आशिया खंडातील हा सर्वात मोठा तरंगता सौर ऊर्जा प्रकल्प एनटीपीसीच्या माध्यमातून उभारण्यात येणार आहे. स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता डॉ.मुरहरी केळे यांचा डॉ.कराड यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. संचालक भादीकर म्हणाले की, खेळाडूंनी नवीन प्रेरणा घेऊन आपल्या कामकाजात त्याचा उपयोग करावा हा स्पर्धेचा उद्देश आहे. मुख्य अभियंता डॉ.केळे म्हणाले की, स्पर्धेत सर्वच खेळाडू जिद्दीने खेळले. विशेषतः अनेक महिला खेळाडू आपल्या लहान मुलांसह स्पर्धेसाठी आल्या होत्या, त्यांचे कौतुक वाटते. परिमंडलातील सर्व सहकाऱ्यांच्या साथीने स्पर्धा यशस्वी करता आली, याचे समाधान असल्याचे डॉ.केळे म्हणाले. स्पर्धेत निवास, भोजन, क्रीडांगण, वाहतूक आदी सर्वच प्रकारची व्यवस्था उत्तम दर्जाची होती. छत्रपती संभाजीनगर परिमंडलाने अतिशय चांगले आदरातिथ्य केले, अशी प्रतिक्रिया खेळाडूंनी मनोगतात व्यक्त केले.



# आ.जयंत पाटील यांचा संविधान उद्देशिका देऊन  केला सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** लोकशाहीच्या दृष्टीने आपणा सर्वांना एकत्र राहून काम करणे गरजेचे आहे. पक्ष फूटीनंतर राज्यात राजकिय परिस्थिती वेगळी झाली आहे. परंतु आपला राजकिय विरोधक हा भाजपच आहे. असे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील यांनी म्हटले. जेजुरी येथील कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर आ.जयंत पाटील हे निरेच्या दिशेने आले.या दरम्यान त्यांनी पुणे जिल्हा परिषदेचे माजी आरोग्य बांधकाम सभापती दत्ताआबा चव्हाण यांच्याशी संवाद साधत असताना भावना व्यक्त केल्या.येणाऱ्या काळात आपल्याला अगदी सावध राहून आपल्या विरोधकांचा सामना करावा लागणार आहे.
त्यामुळे सर्वांनी एकत्र राहिले पाहिजे. कठीण समयी पवार साहेबांची आपण साथ सोडता कामा नये.यावेळी दत्ता आबा चव्हाण यांनी सुद्धा आ.जयंत पाटील यांच्याशी चर्चा केली. शत्रुच्या विरोधात लढण्यासाठी आम्ही खंबीरपणे आपल्या पाठीशी असल्याचे दत्ता आबा चव्हाण  यांनी म्हटले. निरा शिवतक्रार मधील काही प्रश्नां बाबत ही चर्चा करण्यात आली. निरेत आ.जयंत पाटील यांचे स्वागत करण्यासाठी पक्षाचे व महाविकास आघाडीचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.तसेच याच



वेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे पुणे जिल्हा युवक उपाध्यक्ष अमोल साबळे,भारतीय बौद्ध महासभेचे दादासाहेब गायकवाड, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे सागर बागडे यांच्या हस्ते आ.जयंत पाटील यांना संविधान उद्देशिका प्रत आणि धम्मपद ही पुस्तिका देऊन त्यांचे स्वागत पर सत्कार करण्यात आला.हा सत्कार स्वीकारताना आ.जयंत पाटील यांनी सुद्धा विशेष समाधान व्यक्त केले.दत्ताआबा चव्हाण यांनी अमोल साबळे यांचा परिचय करून दिला. पुरोगामी विचारसरणी पुढे घेऊन जाणारी व संविधान मानणारी प्रत्येक व्यक्ती ही आमच्या दृष्टीने महत्वाची आहे. त्यामुळे आम्ही सदैव निरेत आलेल्या प्रत्येक नेत्याचे स्वागत हे भारतीय संविधान उद्देशिका प्रत देऊन करत राहणार आहोत. आ.जयंत पाटील हे निरेत आल्याने त्यांचा सत्कार संविधान उद्देशिका प्रत देऊन करताना आम्हाला विशेष समाधान वाटत आहे. असे संविधान प्रेमी अमोल साबळे यांनी म्हटले

# कोपरगाव सार्वजनिक बांधकाम विभागाला ठेकेदाराची पाचशे कोटीच्या पुढे देणी

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** सार्वजनिक बांधकाम उपविभागीय कार्यलया अंतर्गत मार्च २०२३ पर्यंत वेगवेगळ्या हेड खाली झालेल्या कामाची सुमारे पाचशे कोटी च्या पुढे देणी थकल्याने कत्रांटदार व बांधकाम ठेकेदार यांच्या कर्जावरील व्याजा चा बोज्या सातत्याने वाढत असल्याने शासनास ठेकेदारांची बिले वेळेवर देता येत नसतिल तर वित्तीयसंस्था व बँका यांच्या  कडुन घेतलेले कर्ज व त्यावरील व्याज व शासनाने माफ करण्याची मागणी बांधकाम ठेकेदार संघटने कडुन होत आहे. आमदार खासदार जिल्हा नियोजन बजेट अशा विविध हेड खाली कोपरगाव सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत झालेल्या विकास कामाचा जवळपास पाचशे कोटी च्या पुढे निधी मार्च २०२३ पासून थकल्याने ठेकेदार हवादिल झाले असुन शासनाने व्याज व कर्ज माफ होण्यासाठी मुंबई आझाद मैदान येथे बांधकाम ठेकेदारांनी आरंभलेल्या आंदोलनास कोपरगाव येथील बांधकाम व्यावसायिकांनी पांठिबा दर्शवला आहे मागिल वर्षी सार्वजनिक बांधकाम अधिक्षक कार्यालय अहमदनगर अंतर्गत हजारो कोटी रुपयांची देणी संपूर्ण जिल्हाला असतांना केवळ पाच कोटी रुपये अर्थ विभागाकडून प्राप्त झाल्याने कोपरगाव तालुक्यातील कामे पुर्ण झालेल्या बहुतांश ठेकेदारांची एम बी वरिष्ठ कार्यालयाकडुन परत आल्याचा दुजोरा नाव न सांगण्याच्या अटिवर एका अधिकार्याने दिल्याने ठेकेदार व कत्रांटदार यांनी बिले वेळेवर मिळण्यासाठी आरंभलेल्या आंदोलनास पुष्टी मिळत आहे शासनाकडून मंजूर झालेली कामे वेळेवर पुर्ण होण्यासाठी लोकप्रतिनिधी सह कार्यकर्ते नेहमी बांधकाम कत्रांटदार व ठेकेदारांवर जनते च्या अडचणी पुढे करुन दबाव तंत्र अवलंबतात मात्र बांधकाम व्यवसायिकांची वर्षानुवर्षे थकलेली देणी मिळण्यासाठी शासन स्तरावर म्हणावा तसा पाठपुरावा करतांना कोणिही दिसत नाही.शासकीय काम करतांना येणाऱ्या अडचणी वेळेवर बिल न मिळणे व तथाकथित कार्यकर्त्या कडुन होणार्या त्रासाला कंटाळून अनेक ठेकेदारांनी बांधकाम व्यवसायाला कायमस्वरूपी रामराम ठोकत वेगळ्या व्यवसायात पदार्पण केले आहे अशिच परिस्थिती ठेवुन शासन संपूर्ण बांधकाम क्षेत्र कार्पोरेट कंपन्या च्या घशात घालण्यासाठी चालवलेला हा आटापिटा तर नाही ना अशी शंका उपस्थित होत आहे.

# बातमी दिल्याच्या रागातून पत्रकारांस दिली जीवे मारण्याची धमकी

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** १ फेब्रुवारी रोजी दै.प्रहार या वृत्तपत्रात 'लासलगाव - विंचुर येथे ट्रेडिंग कंपनीच्या नावाखाली रेशनच्या तांदळाचा काळाबाजार' अशा मथळ्याखाली वृत्त प्रकाशित झाले होते. वृत्तपत्रात ही बातमी दिल्याचा राग येऊन विंचुर येथील संबंधित ट्रेडिंग मालकाने पत्रकारास जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी लासलगाव पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत वृत्त असे की, महेश विश्वनाथ साळुंखे व मच्छिंद्र बाळू साळुंखे हे दोघे पत्रकार निफाडकडून विंचुरकडे येत असतांना संबधित ट्रेडिंग कंपनीचे राहुल राजेंद्र कर्पे यांनी

> संबंधीत ट्रेडिंग मालकाने आम्हाला जीवे मारण्याची धमकी दिल्याने आमचे दोघांचेही कुटुंब दहशतीखाली आहे . त्यामुळे आम्हाला धमक्या देऊन आमच्या कर्तव्यापासून परावृत्त करू पाहणाऱ्यांच्या विरोधात पत्रकार सुरक्षा कायदा २०१९ चे अधिनियम २९ नुसार कारवाई करण्यात यावी .
> – महेश साळुंके

राजस्थान स्वीट जवळ महेश साळुंखे यांना आवाज देत बोलावून घेतले व तुम्ही वृत्तपत्रात बातमी का दिली? असे म्हणत, तुम्हा दोघांना आयशर गाडीखाली चिरडून मारून टाकतो, बातम्या लिहायला तुमच्या हात ठेवणार नाही, सर्व अधिकारी लोकांना मी हप्ते देतो, माझ्या विरोधात बातम्या लावल्या तर तुम्हाला जिवंत जाळून टाकेल अशी धमकी दिली, त्यामुळे पत्रकार महेश साळुंके यांच्या फिर्यादीवरून लासलगाव पोलीस ठाण्यात राहुल कर्पे यांचे विरोधात भा.द.वि.५०४,५०६ अन्वये अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे. स.पो.नि.भास्करराव शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली पो.ना.संदीप निचळ अधिक तपास करीत आहेत.

संबधित वृत्तात तथ्य असेल आणि तालुक्यात गोरगरीब नागरिकांच्या घासातील अन्न जर अशा पद्धतीने हिरावून घेण्यात येत असेल तर नवनियुक्त तहसीलदार मा.विशाल नाईकवाडे व लासलगाव येथील नवनियुक्त स.पो.नि.भास्करराव शिंदे या प्रकरणाचा छडा लावून तालुक्यातील रॅकेटचा बिमोड करतील काय? असा सामान्य नागरिकांनी प्रश्न विचारला आहे.

# त्या' वाघाची फासातून सुटका

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** वाघांच्या शिकारी कितीही थांबवण्याचा प्रयत्न केला तरी शिकाऱ्यांचे प्रयत्न काही थांबत नाहीत. असाच एक सापळा टिपेश्वरच्या जंगलात वाघांसाठी शिकाऱ्यांनी लावला आणि वाघ त्यात अडकला. गळ्याभोवती अडकलेला फास घेऊन तो सुटकेसाठी फिरत होता. अखेर या वाघाला बेशुद्ध करून गळ्याभोवतीचा तारांचा फास काढण्यात वनविभागाला यश आले. अमरावती येथील रॅपिड रिस्पॉन्स टीमला पाचारण करण्यात आले होते. अवघ्या एक वर्षे वयाच्या वाघाला शिकाऱ्यांनी लक्ष केले होते. शुक्रवारी या अभयारण्यात पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांना या वाघाच्या गळ्याभोवती फास अडकून असल्याचे दिसून आले. याबाबत टिपेश्वर अभयारण्यातील अधिकाऱ्यांना याबाबत माहिती देण्यात आली. वाघाची शिकारीच्या फासातून मुक्तता करण्यासाठी अमरावती येथील रॅपिड रिस्पॉन्स टीमला पाचारण करण्यात आले.

# गिरीश प्रभुणे यांच्या जातपंचायतविषयक वक्तव्याचा अंनिसच्या वतीने तीव्र निषेध


आधुनिक केसरी न्यूज

**किरणकुमार आवारे**

**निफाड :** ९७ वे अ.भा. मराठी साहित्य संमेलन नुकतेच पार पाडले. त्यातील एका भागात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते गिरीश प्रभुणे यांची मुलाखत घेण्यात आली. या मुलाखतीत त्यांनी जातपंचायतचे जोरदारपणे समर्थन केले. त्यामुळे नवा वाद उभा राहिला आहे. त्यांच्या या वक्तव्याचा महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या जातपंचायत मूठमाती अभियानाने तीव्र निषेध व्यक्त केला असल्याची माहिती जातपंचायत मूठमाती अभियानचे राज्य कार्यवाह कृष्णा चांदगुडे यांनी दिली. प्रभुणे यांना जातपंचायतचे वास्तव माहीत नसल्याने व पंचांना पाठीशी घालण्यासाठी ते जातपंचायतचे समर्थन करत असल्याचे अंनिसने म्हटले आहे. जातपंचायतीकडुन पिडीत कुटुंबाला दिल्या जाणाऱ्या शिक्षा जाणून घेतल्या तरी तिचे क्रौर्य लक्षात येते. महिलेलाविष्टा खाण्याची जबरदस्ती

> प्रभुणे यांचे वक्तव्य हे लोकशाहीला कमकुवत करणारे असून महाराष्ट्र सरकारने संमत केलेल्या जातपंचायत विरोधी कायद्याच्या विरोधात आहे .
> गिरीश प्रभुणे यांचे जातपंचायतची नीट व्यवस्था लावावी असे म्हणणे संविधान विरोधी आहे .
> **– कृष्णा चांदगुडे राज्य कार्यवाह, जातपंचायत मूठमाती अभियान**

करणे, महिलेसजातपंचायतमध्ये नग्नकरण्यात येणे, पिडीत व्यक्तीच्या डोक्यावर मानवीविष्टाव लघवी असलेले मडके ठेऊन ते फोडणे, महिलेला पंचांची थुंकी चाटण्याचीशिक्षादेणे, मुलाच्या हातावर लालबुंद झालेली कुऱ्हाड ठेवणे, महिलेला चारित्र्याच्या संशयावरून उकळत्या तेलात हात घालून नाणे बाहेर काढण्यास भाग पाडणे, महिलेच्यायोनीमार्गात मिरचीची पूड कोंबण्यात येणे, लग्नाच्या पहिल्या रात्री नववधूची कौमार्य परीक्षा घेतलीजाणे, पिडीतांचा जीव घेणे, पिडीतांच्या परिवारास वाळीत टाकणे अशा अमानुष शिक्षा जातपंचायतकडून दिल्या जातात. अशा घटना लांच्छनास्पद असुन राज्याच्या पुरोगामीत्वाच्या परंपरेवर प्रश्नचिन्ह उभ्या करणाऱ्या आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती व प्रसार माध्यमांच्यादबावामुळे महाराष्ट्र सरकारने जातपंचायत विरोधी कायदा बनविला. या कायद्यातजातपंचायत बसवून न्यायनिवाडे करणे व बहिष्कृत करणे गुन्हा ठरविण्यात आले आहे. स्वातंत्र्यापुर्वी जातपंचायतची गरज होती. परंतु संविधान स्वीकारल्यानंतर संस्थाने खालसा करण्यात आली. राजेशाही जाऊन राज्यघटना आली. जातपंचायत समांतर (अ) न्यायव्यवस्था असल्याने व ती लोकशाहीला घातक असल्याने तीला मूठमाती देणे आवश्यक असल्याचे कृष्णा चांदगुडे यांनी पुढे म्हटले आहे. जातपंचायतचे वास्तव प्रभुणे यांना लक्षात आणून देण्यासाठी त्यांना कृष्णा चांदगुडे लिखित 'जातपंचायतींना मूठमूती' पुस्तक पाठविण्यात आले आहे. ते पुस्तक वाचून प्रभुणे आपली भुमिका बदलतील अशी खात्री अंनिसने व्यक्त केली आहे.




# 'संत गाडगे महाराज : वैचारिक व सांस्कृतिकतेचे अधिष्ठान'चे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** खांदेशातील अमळनेर येथे संपन्न झालेल्या ९७ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात नाशिक येथील राष्ट्रीय महिला समाज रत्न प्रा.डॉ.रजनी लुंगसे लिखित "संत गाडगे महाराज : वैचारिक व सांस्कृतिकतेचे अधिष्ठान" या संशोधन ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

ग्रंथ लेखनाच्या अंतर्भागात संत गाडगेबाबांच्या जीवन प्रवासापासून तर त्यांच्या वैचारिक व सांस्कृतिक कार्याची नोंद घेतलेली आहे. महान पथदर्शक भगवान गौतम बुद्ध यांच्या जीवनातील संशोधनात दिसलेली साधर्म्यता, संत कबीर, संत तुकाराम महाराज आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा संत गाडगेबाबांच्या विचारांवर असलेला प्रभाव यामध्ये नोंदविलेला आहे. संत गाडगे महाराज हे आगळ्या वेगळ्या कीर्तन शैलीचे कीर्तनकार तसेच पत्र वाङ्ममयाचे उत्कृष्ट पत्र लेखकही होते याची नोंद या ग्रंथात मिळते. नाशिक येथील ज्ञानसिंधु प्रकाशनाने हा ग्रंथ प्रकाशित केलेला आहे. या शिवायही त्यांची चरित्र ग्रंथ वैचारिक तसेच काव्यसंग्रह अशी अनेक पुस्तके प्रकाशित झालेली आहे. लेखिका प्रताप महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी असून त्याच महाविद्यालयात त्यांच्या मुलत्वाच्या ग्रंथाचे प्रकाशन झाले. प्रकाशनसाठी मान्यवर डॉ.श्री. वि. दा. पिंगळे,(कार्यवाह, म .सा.प पुणे) प्राचार्य श्री.तानसेन जगताप, प्रा. डॉ.दिलीप भावसार, मिलिंद कुढे, नकुल लुंगसे, डॉ.प्रभाकर जोशी, गोकुळ बागुल, सुभाष वाणी आदी उपस्थित होते.



# विनोद वाईन शॉप हठवण्यासाठी आंबेडकरी समाज रस्त्यावर

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मध्यवर्ती पुतळ्याच्या पाठीमागे असलेल्या विनोद वाईन शॉप हठवण्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून आंबेडकरी समाज हा लढा देत आहे. हे वाईन शॉप हठवण्यासाठी आंबेडकरी समाजाच्या वतीने जिल्हा प्रशासनाला वारंवार इशारा देऊन देखील धुळे जिल्हा प्रशासन या संदर्भात कुठलीही कारवाई करत नसल्याने आंबेडकरी समाज संतप्त होऊन आज रस्त्यावर उतरल्याचे चित्र बघायला मिळाले.

धुळे शहरातील आंबेडकरी बांधवांचा अस्मिता असलेला बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ विनोद वाईन शॉप हे गेल्या अनेक वर्षापासून सुरू आहे. हे वाईन शॉप स्थलांतरित करण्यासाठी अनेक पक्ष सामाजिक संघटना यांनी वारंवार जिल्हा प्रशासनाकडे हटवण्याची मागणी केली होती, मात्र जिल्हा प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे आंबेडकरी समाजाचा आक्रमक झाला असून गेल्या अनेक दिवसांपासून धुळे शहरात विविध प्रकारे आंदोलन केले जात आहे त्याचाच एक भाग म्हणून आज धुळे शहरातील अनेक मुख्य रस्त्यांवर आंबेडकरी समाज रस्त्यावर उतरून चक्काजाम आंदोलन करण्यात आले. मुंबई नागपूर महामार्गावर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा संघटक शंकर खरात, अरविंद निकम, सागर मोहिते यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको करण्यात आला. धुळे शहरातील स्वातंत्र्यवीर सावरकर येथील मुख्य रस्त्यावर नगरसेवक नागसेन बोरसे ,रिपाईच्या महिला अध्यक्ष नयना दामोदर, सिद्धार्थ वाघ, विवेक नेतकर यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको करून आंदोलन करण्यात आले. तसेच जुने धुळे भागात असलेल्या सुभाष चौक या ठिकाणी कृपया खरात पक्षाचे जिल्हाध्यक्ष विशाल पगारे बापू अहिरे यांच्या नेतृत्वाखाली तसेच मनोहर चित्र मंदिराजवळ असलेल्या जुना आग्रा रोड येथे सचिन खरात, योगेश पगारे, मयूर गरुड, सागर दामोदर, अजय देवरे, मॉन्टी दामोदर यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात रास्ता रोको करून विनोद वाईन शॉपला विरोध करण्यात आला.

आंबेडकरी समाजाच्या भावना विनोद वाईन शॉप विरोधात अधिकाधिक तीव्र होत असून धुळे जिल्हा प्रशासनाने लवकरात लवकर आंबेडकरी समाजाच्या भावना लक्षात घेऊन वेळीच विनोद वाईन शॉप चे स्थलांतरित करावे अशी मागणी आता जोर धरत आहे त्यामुळे धुळे जिल्हा प्रशासन आता विनोद वाईन शॉप स्थलांतरित करण्यासाठी काय पुढाकार घेतात हे पान महत्वाचं असणार आहे अन्यथा येणाऱ्या काळात यापेक्षाही तीव्र आंदोलन केले जाईल असे आंबेडकरी समाजामधून भावना आता व्यक्त होत आहे.

# प्रा. मनोहर धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** हाळदव येथे सेवा जनशक्ती पार्टी तथा शिवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा मनोहर धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वही पेन व खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन शिवा संघटनेचे तालुका उपाध्यक्ष साधु पाटील वडजे यांच्यावतीने करण्यात आले होते. या कार्यक्रमाला शिवा संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष कालिदास मुस्तापुरे , शिवा संघटना तालुकाध्यक्ष हनुमंतभाऊ लांडगे , गोविंद आनेराव, नारायण पा पवार , चंद्रकांत पा शिंदे , बालाजी शिंदे , दिगांबर शिंदे , सरपंच रंगनाथ पवार , मारोती पा वडजे , गोविंद पा वडजे , दत्ता पाटील शिंदे , शिल्पकार विठ्ठल वडजे , नागनाथ वडजे , हाळदव येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक सानप सर , मोतीकर सर , शेख सर , मुंडे मॅडम , सह शाळेतील कर्मचारी व शालेय विद्यार्थ्यांची प्रमुख उपस्थिती होती.



# मच्छिमार बचाव संघर्ष समितीचे जलसमाधी आंदोलन



आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** नाथसागर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मासेमारी करून उदरनिर्वाह करणाऱ्या हजारो नागरिकांवर उपासमारीची वेळ आणणाऱ्या प्रस्तावित सौर ऊर्जा प्रकल्पाविरोधात नाथसागर धरणात हजारो पुरुष व महिला कुटुंबासह ७ फेब्रुवारीला बुधवार रोजी दुपारी १२ वाजता जलसमाधी आंदोलन करणार असल्याचे निवेदन जायकवाडी मच्छीमार बचाव संघर्ष समितीच्या वतीने प्रशासनाला देण्यात आले आहे. नाथसागर जलाशयाच्या पाणलोट क्षेत्रावर हजारोंच्या संख्येने कहार समाज, आदिवासी भिल्ल व भोई समाज हा मच्छीमारी करून उदरनिर्वाह करतात अश्यात जायकवाडी जलायशाच्या १५ हजार हेक्टर पाण्यावर सौर ऊर्जा प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे. मच्छीमार समाजाला व पक्षी प्रेमींना बहिष्कृत करणाऱ्या या सौर ऊर्जा प्रकल्पाविरोधात जायकवाडी मच्छिमार बचाव संघर्ष समितीच्या वतीने पर्यावरण प्रेमीसह हजारो समाज बांधवांच्या उपस्थितीत तहसीलदार कार्यालय पैठण, जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर याठिकाणी तीव्र आंदोलन तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या समोर आमरण उपोषण केले होते.याप्रश्नी जायकवाडी धरणाचे अभियंता प्रशांत जाधव यांनी सौर ऊर्जा प्रकल्प रद्द करण्यासाठी प्रस्ताव पाठवू असे लेखी आश्वासन दिले असता हे आमरण उपोषण सोडण्यात आले परंतु सरकार दरबारी या आंदोलनाची कुठलिही गंभीर दखल घेतली नसल्याने सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीला शासन खतपाणी घालत असल्याचे निदर्शनास येणाच आता प्रशासनाला निवेदन देऊन जायकवाडी मच्छीमार बचाव संघर्ष समितीच्या वतीने नाथसागर धरणाच्या शासकीय विश्रामगृह मागील पाण्यात दिनांक ७ फेब्रुवारी बुधवार रोजी सकाळी हजारो महिला व पुरुष बांधवांसह कुटुंबासह जलसमाधी आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती जायकवाडी मच्छीमार बचाव संघर्ष समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

# महिलांनी सांस्कृतीक कार्यक्रमात एकत्र यावे : रेखा पाटे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील प्रगती कॉलनी, हिवरखेडा रोड येथे मकर-संक्रांती निमित्त महिलांनी हळदी-कुंकू समारंभाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. यावेळी भारतीय संस्कृतीचे प्रतीक असलेल्या -सौभाग्याचे लेने हळदी कुंकू लावून देवाण-घेवाण करण्यात आली प्रसंगी महिलांनी विविध खेळ, नृत्य, गीतगायन अशा विविध सांस्कृतीक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यात प्रगती कॉलनीतील महिलांनी उत्साहाने सहभाग घेतला. याप्रसंगी सौ. रेखाताई पाटे, सौ. राजश्री शिंपी, सौ वर्षा निकाळजे ,सौ. शोभा घुगे, सौ. वंदना राठोड, सौ. पुष्पा उपाध्ये, श्रीमती नरवडे मावशी, सौ. रागेड मावशी सौ. पुष्पा पैसाणे, सौ. सविता सोनवणे, सौ. अमृता सोनवणे, सौ. अर्चना आकोलका, कोमल चांदवडकरसौ. कविता केदारे, सौ. आरमी रोकडे, अर्चना नरवडे, सौ ज्योमी भांमरे, सौ. अनुपमा कोवळे, सौ. प्रियंका सुरावे, सौ. सुवर्णा पोडव, सौ. देशपांडे मॅडम, सौ.भाग्यश्री दाभाडे, सौ. मृणाली पाटील,सौ. संगिता निकम, सौ .प्रीती नरवडे इत्यादी महीलांचा सहभाग होता .



# एसटी महामंडळाने यांत्रिक कर्मचाऱ्यांची भरती तातडीने करावी : इटंकची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**रमेश कांबळे**

**ठाणे :** एसटी मधील एक महत्त्वाचा कर्मचारी तो म्हणजे निळ्या गणवेशातील वाहनांची दैनंदिन देखभाल करणारा यांत्रिक कर्मचारी एका अर्थाने तो गाड्यांचा डॉंक्टरच यांत्रिक विभागाची सद्य परिस्थितीत कर्मचारी भरती न झाल्याने फारच दयनीय झालेली असल्याचे सध्यातरी चित्र आहे महामंडळाने तातडीने लक्ष देउन यांत्रिक कर्मचाऱ्यांची भरती करण्यासाठी वरिष्ठ पातळीवर प्रयत्न करावेत अन्यथा आंदोलनात्मक भुमिका घ्यावी लागेल असे निवेदन महाराष्ट्र एसटी वर्कर्स काँग्रेस युनियन च्या ठाणे विभागा वतीने ठाणे विभाग नियंत्रकांना देण्यात आले आहे.

या निवेदनात त्यांनी स्पष्ट केले की,विभागीय कार्यशाळा येथे एक काळ असा होता की ४०० यांत्रिक कर्मचारी कार्यरत होते. आज परिस्थिती अशी आहे की त्यापैकी फक्त १०० च्या आसपास कर्मचारी उरलेले आहेत.. दरम्यान च्या काळात अनेकजण सेवानिवृत्त झाले ,काहींनी दुसऱ्या विभागात बदली घेतली,काही महत्त्वाचे असे यांत्रिक विभाग असे आहेत की तिथे दोन ते तीनच कर्मचारी उरलेले आहेत.

यांत्रिक काम हे पार काटेकोरपणे केले जाते त्यात यांत्रिक काम प्रचंड अंगमेहनतीचे असुन कमी मनुष्यबळात दडपशाही करुन प्रशासनाकडून ते करून घेतले जाते,काही कारणास्तव नियोजित काम वेळेवर झालं नाही तर प्रशासकीय कारवाईचा बडगा आहेच.यामुळे कर्मचाऱ्यांचं मनोधैर्य त्यामुळे खचलेले आहे.महामंडळाने यांत्रिक विभाग कधीच अद्यवत करण्याचा प्रयत्नच केला नसल्याचा आरोप पत्रात करण्यात आला किंबहुना यांत्रिक विभाग हा एसटी तील महत्त्वाचा विभाग असताना तो नेहमी दुर्लक्षितच राहिलेला असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य एस टी.वर्कर्स काँग्रेसचे ठाणे विभाग अध्यक्ष सचिन शिंदे यांनी केला आहे,आगार पातळीवर ही कर्मचारी फार कमी प्रमाणात आहेत.उरलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये अनेकजण सेवानिवृत्ती कडे झुकलेले आहेत.


यांत्रिक विभागात तातडीने नोकर भरती करणे गरजेचे असल्याचे इंटक ने केलेल्या सर्वेक्षणात उघड झाल्याचे एसटी इंटकचे ठाणे विभागीय अध्यक्ष सचिन शिंदे यांनी सांगितले व यांत्रिक कर्मचाऱ्यांची भरती करण्यासाठी ठाणे विभाग नियंत्रकांनी पुढे प्रयत्न करावेत यासाठी निवेदन देत असून यांत्रिक भरतीचा प्रश्न राज्यात सर्वत्रच सारखा असुन इंटक सरचिटणीस मुकेश तिगोटे यांच्या नेतृत्वाखाली लवकरच या प्रश्नावर पाठपुरावा केला जाईल वेळप्रसंगी आंदोलनात्मक भुमिका घेण्यात येईल अशा इशारा देखील पत्रात देण्यात आला आहे.

# कोचपदी प्रा.डॉ. तुषार वाकसे, व्यवस्थापक म्हणून क्रीडा संचालक प्रा. राहुल अकुल

आधुनिक केसरी न्यूज

**उल्हासनगर :** अखिल भारतीय आंतर विद्यापीठ 'बेस्ट फिजिक' स्पर्धेच्या मुंबई विद्यापीठ संघाचे कोच म्हणून एस एस टी महाविद्यालयाचे प्रा.डॉ. तुषार वाकसे तर संघ व्यवस्थापक म्हणून क्रीडा संचालक प्रा. राहुल अकुल यांची निवड. अखिल भारतीय आंतर विद्यापीठ 'बेस्ट फिजिक' स्पर्धा कालिकत विद्यापीठ, कालिकत या ठिकाणी संपन्न होणार आहेत. त्या स्पर्धेसाठीचा मुंबई विद्यापीठाच्या संघाची निवड नुकतीच करण्यात आली.या खेळाडूंची निवड मुंबई विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या विभागीय बेस्ट फिजिक स्पर्धांमधून करण्यात आली. आंतर विद्यापीठ संघामध्ये विविध वजनी गटात एकूण 8 खेळाडूंची निवड करण्यात आलेली





आहे. या संघाचे मार्गदर्शक म्हणून एस एस टी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. तुषार वाकसे यांची तर संघ व्यवस्थापक म्हणून क्रीडा संचालक प्रा. राहुल अकुल यांची निवड मुंबई विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मोहन आमृले यांच्या कडून करण्यात आलेली आहे. या निवडीबद्दल महाविद्यालयाकडून त्यांचे अभिनंदन करण्यात आले तसेच स्पर्धांसाठी त्यांना शुभेच्छा ही देण्यात आल्या.

# 'माऊंट किलीमांजारो'वर सीमा मानेकडून संविधान उद्देशिकाचे वाचन

आधुनिक केसरी न्यूज




**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** आपले हक्क आणि अधिकार मिळवुन देण्याची जबाबदारी आपले संविधान पार पाडत असते.त्यामुळे संविधाना बाबत सर्वांनी जागृत असणे गरजेचे आहे.आजही अनेक लोकं संविधाना बाबत अज्ञानी आहेत.संविधान लोकांपर्यंत घेऊन जाण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे.संविधानानेच आपल्याला जगण्याचा अधिकार मिळवून दिलेला आहे.संविधान आहे.

म्हणून आपण आहोत.याची जाणीव निर्माण झाल्यास नक्कीच आपल्याला संविधानाचे महत्व समजेल.संविधानाच्या उद्देशिकाचे वाचन मी शिखरावर केले. मी काही एवढे मोठे काम केलेले नाही.मला ज्या पध्दतीने जगता येते. मला माझे विचार व्यक्त होता येतात. हे सर्व संविधानामुळे शक्य आहे.त्यामुळे संविधान जागृती करणे ही आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.असे गिर्यारोहक सीमा माने यांनी म्हटले आहे.भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून गिर्यारोहक सीमा माने यांनी आफ्रिका खंडातील सर्वोच्च माऊंट किलीमांजारो या शिखरावर चढाई करण्याची मोहीम हाती घेण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार त्यांनी ही मोहीम यशस्वीपणे संपन्न केल्या नंतर त्यांनी शिखरावर फक्त देशाचा राष्ट्रध्वजच नव्हे तर भारतीय संविधानाची उद्देशिका प्रत सुद्धा हातात घेत उद्देशिकाचे वाचन केले. संविधान प्रेमींनी सीमा माने यांचे विशेष कौतुक केले आहे.

संविधाना बद्दल आपल्याला काय वाटते असे सीमा माने यांना विचारले असता त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या. राष्ट्रध्वजा सोबत संविधानाचे उद्देशिका वाचन केल्याने समाधान तर आहेच. शिवाय या पुढील मोहीमेत सुद्धा संविधानाच्या उद्देशिकाचे वाचन करत राहणार आहे.असे सुद्धा गिर्यारोहक सीमा माने यांनी म्हटले.सीमा माने ह्या खंडाळा तालुक्यातील खेड बुद्रुक या गांवची कन्या असून या अनोख्या कामगिरी बद्दल गावकऱ्यांनाच नव्हे तर पंचक्रोशीतील लोकांना सुद्धा समाधान वाटत आहे."आम्ही भारताचे लोक' या वाक्याने सुरुवात होणाऱ्या संविधानातील मूल्यांचा गजर हा शिखरावर सीमा माने यांच्या आवाजातून ऐकायला मिळाला हा भारतीय नागरिकांना अभिमान वाटणारा क्षण बनला.माऊंट एव्हरेस्ट असो किंवा माऊंट किलीमांजारो असो अशा अवघड वाटणाऱ्या अनेक शिखरांवर आपल्या देशातील अनेक गिर्यारोहक हे चढाई करत असतात.देशाचा ध्वज हातात घेऊन सलामी सुद्धा दिली जात असते. परंतु सीमा माने यांनी राष्ट्रध्वजासोबत भारतीय संविधानाच्या उद्देशिकाची प्रत हातात घेऊन वाचन केल्याने संविधानाची जनजागृती करणारा हा उपक्रम बनला.२६ जानेवारी १९५०त रोजो देशात संविधान अंमलात आले. या दिवसाचे महत्व हे संविधानाचे असल्याने या दिवशी मला संविधान उद्देशिका वाचता आले.याबद्दल सीमा माने यांनी समाधान व्यक्त केले.संविधान उद्देशिकका वाचन करण्याची संकल्पना त्यांचे पती मिथुन सर्वगोड यांनी मांडली होती.या संकल्पनेला सीमा माने यांनी सत्यात उतरविले.


हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर

9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन



अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# आसलगावचा न्यु इंडियन क्रिकेट संघ प्रथम

आधुनिक केसरी न्यूज

**पिंपळगाव काळे :** तालुक्यातील पिंपळगाव काळे येथे पार पडलेल्या राही क्रिकेट क्लबच्या वतीने सरपंच चषक २०२४ च्या सिजन २ क्रिकेट स्पर्धेत आसलगावचा न्यु इंडियन क्रिकेट संघाने प्रथम क्रमांक पटकावला. पिंपळगाव काळे येथे टेनिस बॉल क्रिकेट च्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.२९ जानेवारी रोजी झालेल्या अंतिम लढतीत न्यू इंडिया क्रिकेट संघ आसलगाव संघाने मलकापूर ११ पराभव केला व अंतिम सामना जिंकला. यावेळी प्रकाश पाटील माजी जिल्हा परिषद अध्यक्ष यांचे हस्ते आसलगाव संघाला प्रथम, मलकापूर संघाला द्वितीय तर देऊळगाव साकरषा संघाला पारितोषिक वितरण करण्यात आले.

# संतांनी दाखविलेल्या मार्गावर चालल्याने सर्वांचे कल्याण : ह.भ.प. रायवाडीकर

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** संतांनी दाखविलेल्या मार्गावर चाला त्यामुळे सर्वांचे कल्याण होते असे प्रतिपादन हभप आत्माराम महाराज रायवाडीकर यांनी लोहा येथे कै. खोब्राजी पाटील चव्हाण यांच्या ३३ व्या पुण्यतिथी निमित्त आयोजित हरिकिर्तनाच्या कार्यक्रमांत केले.

यावेळी कार्यक्रमाचे आयोजक तथा कै. खोब्राजी पाटील चव्हाण यांचे पुत्र शिवसेनेचे लातूर जिल्हा संपर्क प्रमुख तथा लोहा -कंधार मतदार संघाचे माजी आमदार रोहिदास चव्हाण, सुन माजी नगराध्यक्षा सौ. आशाताई रोहिदास चव्हाण, नातू माजी पं.स. सदस्य डॉ. नवनाथ (बापू) रोहिदास चव्हाण,प्राचार्य डॉ अशोक गवते, माजी जि.प.उपाध्क्ष दिलीप धोंडगे, माजी जिल्हा परिषद सदस्य विठ्ठलराव शेटकार, माजी जि.प. सदस्य विजय धोंडगे, नगरसेवक संभाजी पाटील चव्हाण, माजी पं.स. सभापती सतीश पाटील उमरेकर, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार, शिक्षक सेनेचे प्रदेश उपाध्यक्ष विठ्ठभाऊ चव्हाण, शिवसेनेचे नांदेड दक्षिण तालुकाप्रमुख पद्माकर पाटील सावंत, माजी पं. स. सदस्य वानखेडे, बाबुराव मोरे, बाबाराव शिंदे, रामराव मोरे, बाबाराव पाटील हालगे, टाळकरी तुकाराम कोंडामंगले, सदानंद रामजेवार



रायवाडीकर, मोतीराम पांचाळ, नागोराव कळकेकर, दिलीप बुवा, मोतीराम मोहिते,यांच्या सहित मोठ्या संख्येने भाविक भक्त, मित्रमंडळी, गावकरी मंडळी उपस्थित होते. पुढे बोलताना हभप आत्माराम महाराज रायवाडीकर म्हणाले. शहरांपेक्षा गावात चांगली शुद्ध हवा आहे. संत तुकाराम महाराजांनी चार मार्ग दाखविलेत - भोगातुन भोगात जाणारा मार्ग स्वर्गाची इच्छा करणारे ते शहाणे, काही योगातून भोगात गेले, नाथ महाराजांनी सगळ्या समाजांचे निरिक्षण केले. चांगदेव महाराज म्हणतात काही लोक हे योगात भोगात गेले. चांगले सांगितलेले सर्वांनी ऐकावे पत्नीने सांगितलेले, आई -वडिलांनी सांगितले, भावांनी सांगितलेले ऐकावे. संताचा एक गुण आहे विनम्रता तो सर्वांनी अंगिकारावा. विद्वानाकडे जर विनय नसेल तर त्यांची विद्वत्ता ही विधवा आहे. विद्या विनय शोभते. माणसांनी नेहमी खरे बोलावे दुसऱ्याला आपण काही लपवू शकता पण ईश्वराला लपवू शकत नाही असे हभप आत्माराम महाराज रायवाडीकर म्हणाले.

# शिर्डी लोकसभा मतदारसंघातून खासदारकी लढवण्यासाठी इच्छा : रामदास आठवले

आधुनिक केसरी न्यूज

**शिर्डी :** लोकसभा मतदार संघातून निवडणुक लढण्यास आपण इच्छुक आहोत. याबाबत भाजपाचे जेष्ठ मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व जेष्ठ नेते मधुकर पिचड यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचेशी प्राथमिक चर्चा झालेली आहे . तांत्रिक अडचन आहे. मात्र भाजपाच्या वाट्याला शिर्डीची जागा गेल्यास आपण शिर्डीतून निवडणुक लढवण्याबाबत भाजपा नेतृत्वाशी चर्चा करणार असल्याचे केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी सांगीतले. शिर्डी येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना मंत्री रामदास आठवले यांनी सांगीतले की, देशात आणी राज्यात मोदींच्या नेतृत्वाखाली एनडीएला मोठे यश मिळणार आहे. मोदी सरकारने संविधानाचा सन्मान केला आहे मात्र कॉंग्रेसने सातत्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा द्वेष केला आहे. संविधनाच्या नावावर कॉंग्रेस चुकीचा आरोप सरकारवर करत आहे. संविधनाबाबतच्या कॉंग्रेसने भाजपावर केलेल्या आरोपात कोणतेही तथ्य नाही.उलट कॉंग्रेसनेच डॉ. बाबासाहेब आंबकरांचा वारवांर केलेला अपमान दलित समाज कदापीही विसरणार नसल्याचे आठवले यांनी सांगीतले. प्रकाश आंबेडकरांनी महाविकास आघाडीबरोबरच नाही तर उध्दव ठाकरेंबरोबरच जाण्याचा निर्णय घेतला आहे . अद्याप त्यांना इंडीया आघाडीत समाविष्ट करण्यात आले नाही तरीही प्रकाश आंबेडकरांनी राज्यात लोकसभा निवडनुकीसाठी १२ - १२-१२ जागांचा फ़ॉर्मूला आघाडीसमोर ठेवला आहे त्याचा महाविकास आघाडीने विचार केला पाहीजे .उध्दव ठाकरे यांना भाजपामधील नेत्यांच्या घराणेशाहीबद्दल बोलण्याचा नैतिक अधिकार नाही . मुख्यमंत्री असताना उध्दव ठाकरेंनी स्वतःच्या मुलाला आपल्या मंत्रीमंडळात स्थान दिल्याचे त्यांच्या स्मरणात राहीलेले नाही. एकनाथ शिंदे आमदारांसमावेत भाजपासोबत आले त्यावेळी उध्दव ठाकरे यांनी शिंदे गटासोबत यायला हवे होते. भविष्यात ठाकरेंची कॉंग्रेस आणी राष्ट्रवादी सोबत राजकीय सोयरीक टीकणार नाही. त्यांनी ज़र भाजपा सोबत येण्याची इच्छा व्यक्त केली तर आपण त्यासाठी प्रयत्न करू . आगामी लोकसभा निवडनुकीत मोदींच्या नेतृत्वाखाली एनडीए चारशे जागांचा आँकड़ा पार पाडेल असा विश्वास आठवले यानी व्यक्त केला. राज्यातील दलित जनता आमच्यासोबत असल्याने वंचीतचा फटका महायुतीला अजिबात बसणार नाही भविष्यात आण्णाभाउ साठे आणी महात्मा फुले यांना भारत रत्न देण्याबाबत पंतप्रधान मोदींशी आपण चर्चा करणार असल्याचे आठवले यांनी सांगीतले



# मोबाईलमुळे विद्यार्थी अवांतर वाचनापासून दुर

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** "हम तो मर कर भी किताबो मे रहेंगे जिंदा, गम उन्ही का है जो मर जाये, तो हवा हो जाते है" असे वाचन उद्‌गार गीता बडे हिने डॉक्टर शिवाजीराव काकडे यांच्या लिखित "आबासाहेब आणि मी" या पुस्तकातील आहे. चापडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात मुख्यमंत्री - माझी शाळा सुंदर शाळा अभियान अंतर्गत वाचन चळवळ महावाचन उत्सव कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रम प्रसंगी जवळपास बाराशे विद्यार्थ्यांनी त्यामध्ये सहभाग नोंदवला. कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर प्राचार्य अरुण वावरे, पर्यवेक्षक लक्ष्मण गाडे, सेवानिवृत्त प्राध्यापक सखाराम घावटे, अशोक आघवणे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम प्रसंगी प्राचार्य वावरे म्हणाले की, प्रत्येक विद्यार्थ्यांनी वाचन क्षमता विकसित करावी. आजकालचा विद्यार्थी मोबाईलमुळे अवांतर वाचनापासून, वृत्तपत्रापासून दुरावत चाललेला आहे. वास्तविक वाचनाने मनुष्य वैचारिक दृष्ट्या प्रगल्भ होत असतो म्हणून पालकांनी अगोदर वाचन करावे म्हणजे विद्यार्थी त्यांच्या संस्काराने वाचनप्रिय होतील. शाळेतील परसबाग, शालेय पोषण आहार, स्वच्छता मॉनिटर उपक्रम राबवणे हा या स्वच्छ शाळा सुंदर शाळा उपक्रमाचा उद्देश आहे असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे नियोजन गणित तज्ञ संजयजी मरकड व गणेश कुमार मोरे यांनी केले. सूत्रसंचालन प्राध्यापक दादासाहेब ज्योतीक यांनी केले तर आभार विष्णू दळे यांनी मानले.

# श्री सिद्धेश्वर प्राथमिक विद्यालय रिसोडच्या विद्यार्थ्यांनी लुटला शैक्षणिक सहलीचा आनंद

आधुनिक केसरी न्यूज

**शंकर सदार**

**रिसोड :** श्री सिद्धेश्वर प्राथमिक विद्यालय रिसोड च्या विद्यार्थ्याची शैक्षणिक सहल यावेळी धारतीर्थ लोणार व हिवरा आश्रम येथे गेली. सहलीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी हिवरा आश्रम येथील स्वामी विवेकानंद यांच्या स्मारकाला भेट दिली.विवेकानंद आश्रम शुकदास महाराजांसाठी ओळखला जातो. परंतु महाराजांचे निधन झाले तरीही येथील व्यवस्था महाराजांच्या शिस्ती प्रमाणेच दिसून येते.शुकदास महाराजांनी १४ जानेवारी १९६५ रोजी मेहकर ते चिखली महामार्गावर हिवरा आश्रम गावी या विवेकानंद आश्रमची लोकसेवेसाठी स्थापना केली.विवेकानंद आश्रमाला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा आहे. धर्म आणि विज्ञान यांची सांगड घालणारा अशीही या आश्रमाची ओळख आहे. दीड हजार व्यक्तींना एकाचवेळी ध्यान करता येईल असा ध्यानमंडप येथे आहे. सहा एकर परिसरात स्वामी विवेकानंद स्मारक उभारले जात आहे. अवघ्या २० मिनिटांत अडीच ते तीन लाख जणांना भोजन देण्याचे कसब या आश्रमाची आणखी एक ओळख. यासाठी १ हजार १०० स्वयंसेवक, १०१ ट्रॅक्टर्स दिमतीला



असतात. या विवेकानंद आश्रमात विविध संमेलने झाली आहेत. विवेकानंद ज्ञानपीठ, विवेकानंद अपंग मुलामुलींचे निवासी विद्यालय, विवेकानंद कनिष्ठ कला आणि विज्ञान महाविद्यालय कृषी महाविद्यालय येथे आहे.विद्यार्थ्यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आधारित माहिती घेऊन त्यांच्या कार्याला वंदन केले. श्री सिद्धेश्वर प्राथमिक विद्यालय अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी नेहमीच नवनवीन शैक्षणिक उपक्रम आपल्या स्तरावर आयोजित करत असते. सहलीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच निसर्गाची आवड म्हणून तसेच त्यांच्या सर्वांगीण विकास होण्यासाठी नवनवीन क्षेत्राला भेटी देण्याचे आयोजन शाळेच्या वतीने करण्यात आले. या शैक्षणिक सहलीसाठी वर्ग 3 ते 7 चे विद्यार्थी सहभागी होते. सहल जाणार याच भावनेने सर्वांच्या मनात हर्ष दिसून आला. तसेच सर्वांनी उत्साहाने विवेकानंद स्मारक ला भेट देऊन बोटिंग चा आनंद घेतला. अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांची मानसिक स्थिती आनंदी राहावी यासाठी या सहलीचे आयोजन शाळेच्या वतीने करण्यात आले होते. सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी वन भोजन करून, विविध खेळ खेळून या सहलीचा आनंद लुटला. यावेळी शाळेतील विद्यार्थी, शिक्षक -शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी


सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# 'अग्निदिव्य'तून वास्तव जगाची चित्तरगाथा : ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आपले आयुष्य हे एका चित्रपटासारखे असते. जिथे सुरुवात-मध्यंतर आणि शेवट असतो. संधी म्हणून प्राप्त झालेले जीवन एकदाच असते,त्यामुळे त्याची अनुभूती ही घेणे हा जगण्याचा मूळ गाभा आहे.चांगल्या-वाईट घटना आयुष्यात होणे हा विधात्याचा नियम आहे,त्यामुळे आशिष निनगुरकर यांच्या 'अग्निदिव्य' या चरित्र पुस्तकातून रमाबाई कांबळे यांचा जीवनपट वाचतांना डोळ्यासमोर सिनेमा उभा राहतो आणि हाच प्रवास आपल्याला नवी ऊर्जा देतो.त्यामुळे ही वास्तव जगाची चित्तरगाथा आपल्याला खूप काही देणारी असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांनी केले.

लेखक आशिष निनगुरकर यांच्या लेखनात एक मोठी ताकद आहे . त्यांनी पुस्तकात मांडलेले वर्णन डोळ्यासमोर उभे रहाते . 'अग्निदिव्य' हे चरित्रात्मक पुस्तक विक्रीचा तसेच पुरस्काराचा एक नवा विक्रम करेल हा विश्वास वाटतो .त्याबद्दल आशिष यांचे खूप कौतुक .
**सुनील बर्वे ( प्रसिद्ध अभिनेते )**




येथील युवालेखक आशिष निनगुरकर यांच्या चपराक प्रकाशन निर्मित नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'अग्निदिव्य'या पुस्तकाच्या स्वागतासंदर्भात राजदत्तजी बोलत होते.यावेळी प्रसिद्ध अभिनेते सुनील बर्वे,संकलक भक्ती मायाळू व इतर मान्यवर उपस्थित होते.नुकताच केंद्र सरकारतर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'पद्मभूषण' पुरस्कार जाहीर झाला आहे. एकापेक्षा एक दर्जेदार चित्रपटांचे दिग्दर्शन करणाऱ्या या तपस्वी दिग्दर्शकाचे कौतुक करायला ही सर्व मंडळी जमली होती. यावेळी युवालेखक आशिष निनगुरकर देखील उपस्थित होते.
या छोटेखानी कार्यक्रमात आशिष यांच्या नव्या 'अग्निदिव्य' पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. दिग्दर्शक राजदत्तजी यांचा अभिनेते सुनील बर्वे यांनी पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. यावेळी लेखक आशिष निनगुरकर यांनी त्यांच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या 'अग्निदिव्य' पुस्तकाची वास्तवगाथा कथन केली. एका महिलेच्या आयुष्यात-संसारात कुठल्या घटना घडू शकतात हे या पुस्तकातून अगदी बारकाईने मांडले आहे. कुणाचेच आयुष्य साधे-सरळ नसते, त्यात अनेक छटा त्यात असतात. हेच या पुस्तकातून सखोलरित्या विशद केले आहे. पुस्तके आपल्याला खूप काही देऊन जातात.पुस्तकांमुळे आपले आयुष्य पूर्णतः बदलून जाते.तेच आपले सख्खे जिवाभावाचे मित्र बनतात.त्यामुळे आशिषच्या या नव्या पुस्तकाचे अभिनेते सुनील बर्वे यांनी स्वागत केले.आशिषचे पहिले पुस्तक आमच्या 'हरबेरियम' उपक्रमावर होते.त्यावेळी आशिषची मोलाची मदत झाली होती. असे अभिनेते सुनील बर्वे यांनी सांगितले. चपराक प्रकाशनातर्फे नुकतेच आशिष यांचे 'अग्निदिव्य' हे चरित्र पुस्तक नुकतेच बाजारात दाखल झाले आहे.या पुस्तकाचे कौतुक अनेक दिग्गज मान्यवरांकडून होत आहे.सूत्रसंचालन केदार भारती तर आभार आकाश देसाई यांनी मानले.

# गाव चलो अभियानाची रत्नपुर-खुलताबाद तालुक्यात आजपासून सुरुवात

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** गाव चलो अभियान खुलताबाद तालुक्यातील गदाणा येथुन सुरूवात करण्यात आली त्यानंतर गोळेगाव, घोडेगाव, सोनखेडा, मावसाळा, ममनापुर या गावात गाव चलो अभियान राबविण्यात आले, या गाव चलो अभियानाचा समारोप आज भडजी येथे करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रस्तावित भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे यानी केले प्रास्ताविक भाषणात बोलताना प्रकाश वाकळे म्हणाले कि 2014 ला देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यानी देशाची सुत्रे हातात घेतली व सामान्य नागरिकाच्या हिताचे लोककल्याणकारी योजना राबविण्यास सुरुवात केली, त्यामध्ये प्रधानमंत्री सन्मान निधी योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला गॅस योजना, आयुष्यमान भारत कार्ड योजना,किसानक्रेडिट कार्ड योजना, जनधन योजना, स्वच्छ भारत अभियान, हर घर नल से जल योजना, अशा अनेक योजना राबवून कोरोना काळात मोफत धान्य वाटप करण्यात आले , मोफत लसीकरण करण्यात आले,370 कलम हटवण्यात आले, राममंदिर बनवून लोकार्पण करण्यात आले, अशा विषयावर पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यानी काम करून देशाची अर्थव्यवस्था 11 नंबरहुन 3 नंबर वर आणली आहे. आमदार प्रशांतजी बंब साहेब यांनी खुलताबाद तालुक्यात प्रत्येक गावात , वाडी वस्तीवर निधी देऊन गावाचा विकास केला आहे , वैयक्तिक लाभाच्या योजना घराघरात पोहचवून , मोठमोठी रस्त्याची व पुलाची कामे या रत्नपुर-खुलताबाद तालुक्यात आमदार प्रशांत बंब साहेबाच्या माध्यमातून झाली आहे, भडजी या गावाचे सांगवयास गेले तर भडजी गावाला भरघोस निधी दिला आहे त्यामध्ये नदीवर सिमेंट बांध, गावात सिमेंट रस्ते, सामाजिक सभामंडप, गिरिजा नदीवर पूल , विद्यार्थ्यांना बसण्यासाठी शाळा 3 वर्ग खोल्या असेल, असा प्रकारचा करोडो रू निधी भडजी या गावाला दिला आहे याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने प्रकाश वाकळे यानी आमदार प्रशांतजी बंब साहेब यांचे आभार व्यक्त केले , तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे यानी देखील उपस्थित गावकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले , प्रकाश चव्हाण यानी समारोपीय भाषण करून कार्यक्रम संपवण्यात आला या वेळी जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे, विधानसभा निवडणूक प्रमुख विकास कापसे, तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे,माजी जि.प.उपाध्यक्ष तथा जिल्हा सरचिटणीस एल.जी. गायकवाड, प्रकाश वाकळे ,गाव चलो अभियान तालुका संयोजक सतीश दांडेकर, सह संयोजक शिवाजी गायकवाड, शहराध्यक्ष परसराम बारगळ, मा.उपसभापती दिनेश अंभोरे, प्रकाश चव्हाण, उपनगराध्यक्ष सुरेश मरकड, नगरसेवक योगेश बारगळ ,अविनाश कुलकर्णी, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष सतिश खंडागळे, प्रशांत गदानकार,राजु ठेंगडे, सुरेश जाधव, बाबासाहेब औटे, नंदकुमार चव्हाण, हरिदास म्हसकर, द्वारकादास जाधव, गणेश अधाने, आप्पाराव वाकळे, दत्ता औटे, अमोल गवळी, किरण बोडखे,अंकुश काळे, रावसाहेब देशमुख, गणेश वाकळे; अंकुश होळकर, राजेंद्र वाकळे, सुनील वाकळे, बाळु वाकळे, बाबासाहेब वाकळे, बद्रीनाथ वाकळे, अंबादास वाकळे, अंकुश वाकळे, अमोल वाकळे,भाऊसाहेब वाकळे, विजय वाकळे, काकासाहेब गायकवाड , निलेश गायकवाड, योगेश वाकळे , शाईनाथ वाकळे,प्रमोद वाकळे,सुनील वाकळे आदी सह गावातील नागरिक उपस्थित होते.





# एव्हरग्रीन इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची लक्ष्मी ॲग्रो टुरिझमला भेट

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** कृषी व ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित एव्हरग्रीन इंग्लिश स्कूल अंबेलोहोळ ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर शाळेची शैक्षणिक सहल लक्ष्मी ॲग्रो टुरिझम श्रीरामपूर या प्रसिद्ध ठिकाणी आयोजित करण्यात आली होती. शैक्षणिक सहलीमध्ये विद्यार्थ्यांनी रेन डान्स, स्विमिंग, वॉटर पार्क, बोटिंग, हॉर्स रायडिंग व कृषी पर्यटनाचा मनसोक्त आनंद घेतला. लक्ष्मी अग्रो येथे उत्तम नाष्टा, जेवण व चहा बिस्किटचीही व्यवस्था केली होती . त्याचबरोबर नेवासे येथील खांबास टेकून संत ज्ञानेश्वर माउलींनी सच्चिदानंद बाबांना ज्ञानेश्वरी सांगितलेल्या पैस खांबाचेही दर्शन विद्यार्थ्यांनी घेतले एव्हरग्रीन इंग्लिश स्कूल विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने अभिनव उपक्रमांचे आयोजन करत आहे. शैक्षणिक सहलीमध्ये कार्यकारी संचालक श्री गणेश बनकर पाटील डॉ. शिवाजी केसकर श्रीमती सुरेखा फोलाने मॅडम श्रीमती ज्योती शिंदे श्रीमती रेखा गेडाम मॅडम श्रीमती निकिता जाधव मॅडम श्रीमती चैताली सोमवंशी मॅडम श्री अनिल चव्हाण श्री नारायण राठोड श्रीमती गीता पायगुडे शिक्षक सहभागी झाले होते.


शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर

घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी

प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू

घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738

रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117

व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181

वितरण स्थितीसाठी 9021395308

घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com

sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर

प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर


# सोनई शहर बनले अवैद्य धंद्याचे माहेर घर; बिगो मटका जोरात

आधुनिक केसरी न्यूज

**सोनई :** संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले शनिशिंगणापूर आणि सोनई परिसरात अवैध धांद्यानी जोर धरला असून नुकतेच नव्याने रुजू झालेले सहा पोलीस निरीक्षक आशिष शेलार यांच्यापुढे एक आवहन असून बेकायदा व्यवसाय बंद करण्याचे, तसेच बिगो मटका जोरात सुरु असून यातून आर्थिक उलाढाल मोठी असल्याने तरुण वर्ग अडकला जात आहे.

अनेक दिवसापासून परिसरात हातभट्टी दारू, मटका,जुगार, बिगो,इत्यादी प्रकारचे धंदे चालू असल्याने अनेक तरुण वर्ग याकडे आकर्षित होताना दिसत आहे.काहीची प्रपंचाची होळी झाली आहे, कुटुंब कुटुंबातील शिक्षणसाठी मुले -मूलीना पैसे नसल्याने शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ आली आहे. शाळा कॉलेज परिसरात मावा गुटखा असल्याने संबधित अंन व प्रशासन देखील याकडे दुर्लक्ष करताना दिसत आहे.अनेकांनी दारूच्या व्यासणपयीआपले जीव गमावले असून अनेक कुटुंब व्यसानापाई कर्जबाजारी झाले आहेत. अधिकाऱ्यांनी सदर अवैध धाद्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याने या व्यवसायाला एक प्रकारे राजमान्यता असल्यासारखे चालना मिळत गेली आहे. या प्रकारामुळे दहशत गुंडागर्दी चे प्रमाण वाढले, असून नवीन रुजू झालेले अधिकाऱ्यांनी याबाबत लक्ष घालावे,अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे.तसेच जिल्हा पोलिस प्रमुख राकेश ओला यांनी या परिसरकड़े लक्ष देतील का? असा सवाल उपस्थित होऊ लागला आहे.





# धनगर आरक्षण प्रश्नी म्हसवडमध्ये आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** आर्किटेक्ट गणेश विमल दादा केसकर या बावकलवाडीच्या युवकाने धनगर आरक्षण प्रश्नी २० दिवस लोणंद येथे उपोषण केले होते.धनगर समाज बांधवांकडून विविध स्वरुपाची आंदोलने याच उपोषणाच्या अनुषंगाने करण्यात आली होती.लोणंद सह खंडाळा तालुकाच नव्हे तर आसपासच्या भागातून सुध्दा लोकं या आंदोलन स्थळी भेट देऊन आपल्या भावना तीव्र शब्दात व्यक्त करत होते. आमदार,खासदार,मंत्री आदींनी सुद्धा या आंदोलनाची दखल घेत भेटी दिल्या होत्या.खंडाळा येथे हायवेवर करण्यात आलेल्या रास्ता रोको आंदोलना नंतर या प्रश्नी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करण्याचे आश्वासन ही देण्यात आले होते. तद्नंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.परंतु याच रास्ता रोको आंदोलनाने अनेकांवर गुन्हे दाखल करण्यात आले.धनगर आरक्षण प्रश्नी मुख्यमंत्री यांच्या समवेत भेटीचा योग जुळून आला.परंतु धनगर आरक्षण प्रश्नी आजही कोणताही तोडगा निघत नसल्याने अखेर गणेश केसकर यांना पुन्हा एकदा उपोषण करण्याची वेळ आलेली आहे.हे उपोषण लोणंदला नव्हे तर लोणंदपासून तब्बल १०० किलोमीटर असलेल्या म्हसवड येथे सुरू करण्यात आलेले आहे.गणेश केसकर (बावकलवाडी,खंडाळा) यांच्या सह जयप्रकाश हुलवान आणि उत्तम वीरकर (म्हसवड) आदी आंदोलन स्थळी बसलेले आहेत. गणेश केसकर यांनी ज्यापद्धतीने लोणंदला आंदोलन केले. अगदी तीच पद्धत म्हसवडच्या आंदोलनात वापरली जात आहे. लोणंदला ज्या पद्धतीने इशारा मेळावा घेतला होता.अगदी त्याच पद्धतीने इशारा मेळाव्याचे आयोजन आता म्हसवड मध्ये करण्यात आलेले आहे.धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची दुरुस्तीची शिफारस केंद्राला पाठवण्याकरिता म्हसवड येथील उपोषण कर्ते आर्किटेक्ट गणेश विमल दादा केसकर,जयप्रकाश हुलवान,उत्तम वीरकर यांना पाठिंबा देण्यासाठी व आंदोलनाची दखल शासन दरबारी घेत नसल्याने राज्यव्यापी धनगर समाजाचा इशारा मेळावा रविवार दिनांक ४ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी ३ वाजल्यापासून घेण्यात आलेला आहे.





# राणी चेन्नम्मांच्या स्मरणार्थ अभियानात जिल्ह्यातील सेवाभावी संस्थांचा पुढाकार

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** ब्रिटीश वसाहतवादाच्या विरोधात कित्तूर सैन्याचे नेतृत्व करणाऱ्या पहिल्या महिला राणी चेन्नम्मा कर्नाटकात लोकनायक मानल्या जातात. यंदा 2024 हे वर्ष हे राणी चेन्नम्मांच्या ब्रिटीश साम्राज्यवादाविरुद्धच्या लढ्याचे 200 वे वर्ष आहे. त्यांच्या स्मरणार्थ 21 फेब्रुवारीला सकाळी 11 वाजता कित्तूर (कर्नाटक) येथे दिवसभर कार्यक्रम होईल. राणी चेन्नम्माचा प्रेरक वारसा पुढे नेण्यासाठी देशभर अभियान राबविले जाईल. देशभरातील महिला त्यात सहभागी होतील, अशी माहिती सामाजिक कार्यकर्त्या नाजनीन शेख, डॉ. पौर्णिमा वानखेडे यांनी रविवारी शहरातील साक्री रोडवरील पत्रकार भवनात झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

राणी चेन्नम्मांच्या स्मरणार्थ राबविल्या जाणाऱ्या या देशव्यापी अभियानास धुळे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सेवाभावी संस्था व राष्ट्रसेवा दल, सर्वोदय, ज्येष्ठ पत्रकार रमेश दाणे, कॉ. एल. आर. राव, प्रा. झिनत, हरिजन सेवा संघाचे मधुकर शिरसाट यांनी पुढाकार घेतला. येत्या काही दिवसांत आणखी काही संघटना यात सहभागी होतील. स्वातंत्र्य आणि स्वाभिमानाच्या प्रेमाला मूर्त रूप देणाऱ्या प्रतिकाराचे प्रतीक म्हणून राणी चेन्नम्मांच्या स्मरणार्थ त्यांच्या लढ्याचे 200 वर्ष साजरे करण्यासाठी अनहद व भारतीय महिला राष्ट्रीय महासंघाने पुढाकार घेतला आहे.

कर्नाटक राज्य महिला दुर्जन्यविरोधी ओक्कुटासोबत समन्वय करून कित्तूर व देशभरात हे वर्ष साजरे केले जाईल.

राज्यघटना, धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही यांच्या रक्षणासाठी अत्याचार, अन्याय व दडपशाहीविरुद्धच्या संघर्षाचा वारसा पुढे नेण्यासाठी अल्पावधीतच या मोहिमेत मोठ्या संख्येने महिला संघटना व नागरिक सहभागी होणार आहेत. कित्तूर येथील सभा व दिवसभराच्या कार्यक्रमात देशभरातून प्रमुख महिला कार्यकर्त्या सहभागी होणार आहेत. त्यानंतर ही मोहीम देशभर राबविली जाईल, अशी माहितीही नाजनीन शेख यांनी यावेळी दिली. करुन्नीसा शेख सय्यद, माया रवींद्र शिरसाट आदी पत्रकार परिषदेला उपस्थित होते.

# भाजपा आमदार गणपत गायकवाड याने केलेल्या गोळीबाराचा राष्ट्रवादीकडून निषेध

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** उल्हासनगर येथे भाजपा आमदार गणपत गायकवाड याने शिंदे सेनेचे शहरप्रमुख तथा माजी नगरसेवक महेश गायकवाड व राहुल पाटिल यांच्यावर पोलिस निरिक्षकांच्या कार्यालयात दिवसाढवळ्या गोळीबार केला. या घटनेचे पड़साद राज्यभर उमटत आहेत. सरकार मधली आमदार अश्या प्रकारे कायदा हातात घेत असल्यामुळे राज्यातील कायदा सुव्यवस्तेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटनीस तथा जिल्हा कार्याध्यक्ष प्रसेनजीत पाटिल यांनी जळगाव जामोद येथे पक्षाच्या पदाधिकार्यासह महात्मा गांधी यांच्या पुतळ्या समोर मौनव्रत करुन सदर घटनेचा निषेध व्यक्त केला. कायदा सुव्यवस्था राखन्यात राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस अपयशी ठरल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. भाजपा आमदार गायकवाड यांनी मुख्यमंत्री शिंदे यांच्यावर गुंडगिरी तथा भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप केलेत भाजपा त्या आरोपा संदर्भात भूमिका घेणार की स्वपक्षातील आमदारावर कड़क कार्रवाई करणार हे राज्यातील जनता बघणार असल्याचे प्रतिपादन प्रसेनजीत यांनी केले. यावेळी राष्ट्रवादी जिल्हा प्रवक्ता करीम खान,विधानसभा अध्यक्ष विश्वास भालेराव, शहराध्यक्ष ईरफान खान,माजी नगरसेवक संजय देशमुख, जिल्हा सरचिटनीस मोहसीन खान,महादेव भालतड़क, दत्ता डिवरे, सिद्धार्थ हेलोड़े, हनुमंतराव देशमुख,विठ्ठल वाघ,शेख ताहेर यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते



# सकल ओबीसी समाजाने तहसीलदार व आमदारांना दिले निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** तालुक्यातील सकल ओबीसी समाजाच्या भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील सर्वपक्षीय नेत्यांसह नागरिकांच्या वतीने भव्य मोर्चा काढून तहसीलदार राजेश सरवदे व आमदार मेघना साकोरे बोर्डीकर यांच्याकडे दिल्या निवेदन या निवेदनात ओबीसी समाजाच्या 27% आरक्षणातून मराठा समाजाला आरक्षण देऊ नये म्हणून निवेदन देण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी तहसीलदार राजेश सरोदे व आ. मेघना बोर्डीकर यांच्या कार्यालयात कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाधर बोर्डीकर यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात राज्य शासनाने मोठा आरक्षणासंदर्भात सगेसोयरे या शब्दांची व्याख्या बदलून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी राजपत्र मसुदा काढला आहे. त्यामुळे ओबीसी समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून हा निर्णय मूळ ओबीसीवर अन्यायकारक आहे. त्याचबरोबर शिंदे समिती ही घटनात्मक नसताना शिंदे समितीच्या शिफारशीवरून कोणीबी प्रमाणपत्र देणे हे घटनाबाह्य असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. मराठा समाजाला ओबीसी समाजाच्या 27% यातून आरक्षण दिले तर ओबीसी मध्ये असलेल्या 376 समाजातील नागरिकांचे आरक्षण धोक्यात येऊ शकते. त्यामुळे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्राची वितरण ला स्थगिती देण्यात यावी. राज्यातील गोरगरीब ओबीसी भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गांचे आरक्षण वाचावे नसता तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी ओबीसी नेते नानासाहेब राऊत, राजाभाऊ नागरे, प्रसादराव बुधवंत ,डॉ. पंडित दराडे, बंडू लांडगे, अशोक बुधवंत, विलास चव्हाण मतीन तांबोळी योगेश कंठाळे, कृष्णा सोनटक्के, अरविंद कटारे, डॉ. निशांत मुंडे, भगवान वटाणे, वाल्मीक गडदे आदी कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# गृहमंत्र्यांचा राजीनामा घ्या; अन्यथा रस्त्यावरचे आंदोलन

## डॉ. गोपाल बशिरे : गृहमंत्री कायदा व सुव्यवस्था राखण्यात अपयशी

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** महाराष्ट्रात वाढत असलेला गुंडाराज याला खतपाणी घालणारे गृहमंत्री यांचा राजीनामा घ्या अन्यथा रस्त्यावर उतरून आंदोलन करू असा इशारा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा संघटक डॉ. गोपाल बशीरे यांनी राज्यपालांना तहसीलदार मार्फत दिला. उल्हासनगर येथे भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी शिंदे सेनेच्या शहर प्रमुख तथा माजी नगरसेवक महेश गायकवाड व राहुल पाटील यांच्यावर पोलीस निरीक्षकाच्या कार्यालयात दिवसाढवळ्या गोळीबार केला या घटनेचे पडसाद राज्यभर उमटत आहे. सरकारमधील आमदार अशा प्रकारे कायदा हातात घेत असल्यामुळे पुरोगामी छत्रपती शिवाजी, शाहू, फुले, आंबेडकरच्या राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न एरणीवर आला आहे.राज्याचे गृहमंत्री कायदा व सुव्यवस्था राखण्यात अपयशी ठरत आहेत व गृहमंत्री हेतू पुरस्कार या गुन्हेगारीकडे डोळे झाक करत



आहेत. आज महाराष्ट्रात गुंडाराज, माफियाराज, जंगलराज फोफावत आहे.राज्याचे प्रमुख म्हणून आपण त्वरित गृहमंत्र्यांचा राजीनामा घ्यावा व या महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्थेचे राज्य निर्माण करावे असे न झाल्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष संविधानिक मार्गाने रस्त्यावरची लढाई लढेल याची गांभीर्याने नोंद घ्यावी यावेळी गृहमंत्र्याच्या विरोधात घोषणाबाजी करून तहसीलदारा मार्फत राज्यपालांना निवेदन देण्यात आले. याप्रसंगी जिल्हा संघटक डॉ. गोपाल बशीरे, शहर प्रमुख गजानन जाधव, युवा तालुकाप्रमुख जीवन घायाळ, कृउबास संचालक विजय मोरे, तेजराव घायाळ, तालुका संघटक कैलास अंभोरे तालुका उपप्रमुख श्रीकांत नागरे, परमेश्वर दहातोंडे, प्रकाशजी सानप, श्यामभाऊ राऊत, उपशहर प्रमुख लूकमान कुरेशी, शहर संघटक तानाजी मापारी, युवा शहरप्रमुख श्रीकांत मादनकर, अल्पसंख्यांक तालुकाप्रमुख सय्यद उमर, अल्पसंख्यांक शहर प्रमुख इकबाल कुरेशी,फिरोज खान, गफार शहा, लालूभाई शेख, वसीम शेख, राजू बुधवत अश्रूबा धारकर, सुभाष पुरी, राजू जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.



# छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य लोकशाहीला बळ देणारे : आ. जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शिवरायांच्या पूर्वी अनेक राजे होऊन गेले शिवरायां नंतरही अनेक राजे उदयास आले. पण सर्वात लोकप्रीय व आदर्श राजा म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांना ओळखले जाते. त्यांचे स्वराज्य बद्दल असणारे प्रेम, निष्ठा, पराक्रम व निष्कलंक चारित्र्य, शेतकर्यांच्या भाजीच्या देठालाही हात लागता कामा नये. असा आदेश सेनेला देत शेतकऱ्यांचा हिताचा विचार करणारे महाराज हे प्रजादक्ष राजे होते. त्यांचे कार्य लोकशाहीला बळ देणारे असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले.

चंद्रपूर जिल्ह्यात सांस्कृतिक कार्य विभाग, महासंस्कृती व चंद्रपूर जिल्हा प्रशासनातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्यावर आधारित महानाट्य "जाणता राजा" महानाट्य चे प्रयोग दिनांक ०२ ते ०५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान चांदा क्लब ग्राउंड, येथे आयोजित करण्यात आले आहे. दरम्यान सदर महानाट्याच्या दुस-या दिवशी आमदार किशोर जोरगेवार यांची प्रमूख उपस्थिती होती. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मनपा आयुक्त विपिन पालिवाल, तहसिलदार विजय पवार, उपायुक्त खवले, माता महाकाली महोत्सव समितीचे सचिव अजय जयस्वाल, माजी नगर सेवक बलराम डोडाणी, सूर्यकांत खनके, यांच्यासह इतर मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, शिव छत्रपती महाराज आमचे आराध्य आहे. त्यांच्या जिवणकार्यावर आधारीत नाट्य प्रयोगाचा नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित राहत लाभ घेत आहे. मात्र प्रशासनाने येणा-या नागरिकांना परत पाठवू नये. त्यांना नाट्य प्रयोग पाहात येईल यासाठी त्यांची व्यवस्था करावी असे ते यावेळी म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात हुकुमशाही नव्हती. ते रयतेचे राज्य होते. पून्हा आपल्याला शिव छत्रपती महाराज यांच्या विचारांचे अनुसरण करुन रयतेचे राज्य स्थापन करण्याची गरज आहे. जगातील पहिल्या लोकशाहीचा प्रयोग कदाचित शिवाजी महाराज यांच्या कार्य काळात झाला असावा असे ते यावेळी म्हणाले.

आज चंद्रपूरात सलग चार दिवस सदर नाट्य प्रयोग सादर केल्या जाणार आहे. या नाट्य प्रयोगाच्या माध्यमातून आपल्याला छत्रपती शिवाजी महाराज यांची लोकहिताची कार्यप्रणाली अनुभवता येणार आहे. त्याकाळी स्वराज्य निमिर्तीसाठी त्यांनी केलेल्या संघर्षाचा इतिहास दर्शविणारे हे नाट्य आहे. एका नव्या उर्जेचा संसार यातून होणार असल्याचे यावेळी ते म्हणाले. या प्रसंगी आमदार किशोर जोरगेवार व माता महाकाली महोत्सव समीतीच्या वतीने सदर महानाट्यातील कलाकारांचा माता महाकालीची मुर्ती देत सन्मान करण्यात आला. सदर नाट्य प्रयोग पहाण्यासाठी हजारो नागरिकांची उपस्थिती होती.

# चंद्रपुरातील मराठा समाज व खुल्या प्रवर्गांचे सर्वेक्षण पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या निर्देशानुसार मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील सामाजिक, शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी हाती घेतलेले सर्वेक्षण हे १०० टक्के पूर्ण झाले आहे. सर्वेक्षणादरम्यान ४ हजार ९०९ घरे बंद आढळली असून ४८८ कुटुंबियांनी सर्वेक्षणास नकार दिला. त्यामुळे शहरात ९३.२७ टक्के कुटुंबांची माहिती गोळा होऊ शकली.

राज्य मागासवर्ग आयोगाच्या निर्देशाप्रमाणे चंद्रपूर शहरातील २३ फेब्रुवारी २०२४ पासून मराठा व खुल्या प्रवर्गातील समाजाचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले होते. हे सर्वेक्षण नुकतेच दिनांक २ फेब्रुवारीला पूर्ण झाले. चंद्रपूर शहरातील ८० हजार ९५१ कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यासाठी सुमारे ८७४ कर्मचारी कार्यरत होते. सर्वेक्षणाचे उद्दिष्ट गाठून ३ फेब्रुवारी २०२४ रोजी चंद्रपूर मराठा व खुल्या प्रवर्गातील समाजाचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात आले, अशी माहिती महानगरपालिका उपायुक्त अशोक गराटे यांनी दिली.

राज्य मागासवर्ग आयोगाने पाठविलेल्या मास्टर ट्रेनरने महानगरपालिकेतील नोडल अधिकारी, सहाय्यक नोडल अधिकारी आणि मास्टर ट्रेनर यांना प्रशिक्षण दिले होते. त्यानंतर महानगरपालिकेचे नोडल अधिकारी, सहाय्यक नोडल अधिकारी आणि मास्टर ट्रेनर यांनी महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना सर्वेक्षणाबाबतचे प्रशिक्षण दिले होते. तसेच सर्वेक्षणासाठी खास अत्याधुनिक सॉफ्टवेअर तयार करण्यात आले होते. सर्वेक्षणादरम्यान एकूण १६० ते १८२ प्रश्न विचारण्यात आले असून मराठा व खुल्या प्रवर्गातील कुटुंबाची माहिती प्रश्नावलीद्वारे भरून घेण्यात आली. सदर माहिती मुलभूत, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, आरोग्य विषयक होती. कुटुंब आरक्षित प्रवर्गातील असल्याचे समजल्यानंतर प्रगणकाने त्या कुटुंबाची पुढील माहिती घेतली नाही. ही कार्यवाही आयुक्त विपीन पालीवाल व अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली,उपायुक्त अशोक गराटे यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणात करण्यात आली.

दरम्यान, ३१ जानेवारी पर्यंत ५६ हजार २४६ कुटुंबाचे सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले होते. जी घरे बंद होती त्यांना कर्मचाऱ्यांनी पुन्हा भेट दिली होती. मात्र त्यातील काही घरे बंदच असलेली आढळली. त्याचप्रमाणे सर्वेक्षणास नकार देणाऱ्या कुटुंबांची कर्मचाऱ्यांनी पुन्हा भेट घेऊन त्यांचे समुपदेशन करण्याचा प्रयत्न केला. सर्वेक्षण दरम्यान काही नागरिकांमध्ये या सर्वेक्षणाबाबत भीती व शंका - कुशंका असल्याचे जाणवले.



# युवक व ज्येष्ठांचा ॲड. नकुल देशमुख यांच्या नेतृत्वात भाजपमध्ये प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे.**

**रिसोड :** तालुक्यातील ग्राम वाघी व कोयाळी येथील युवक व जेष्ठ मंडळीनी भाजप रिसोड मालेगाव विधानसभा निवडणुक प्रमुख ॲड नकुल देशमुख यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टी मधे प्रवेश केला.

देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारचा माध्यमातून मोठ्या झपाट्याने देश व महाराष्ट्र राज्य प्रगती करीत आहे.तसेच भाजपाचे महाराष्ट्र राज्य प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वात भाजप मधे संघटन राज्यात अग्रक्रमावर आहे. सोबतच रिसोड मालेगाव विधानसभेत भाजप नेते ॲड नकुल देशमुख यांनी मोठ्या प्रमाणात विकास निधी मंजूर करून खीळ पडलेल्या विकासाला गती दिली व येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणात निधी मंजूर करून आणणार आहेत ही मतदार संघासाठी महत्त्वपूर्ण बाब असून यामुळे मतदारसंघात एक उमेद तयार झाली आहे. यामुळे आम्ही सर्व युवक व जेष्ठ ॲड.नकुल देशमुख यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टी मधे प्रवेश करीत असल्याचे प्रवेश केलेल्या मंडळींनी प्रतिक्रिया दिल्या.यावेळी भाजप नेते ॲड नकुल देशमुख यांनी पक्षात प्रवेश केलेल्या वाघी व कोयाळी येथील मंडळींचा सत्कार करून पक्षात स्वागत केले.यावेळी भारतीय जनता पक्षाचे तालुका अध्यक्ष स्वप्निल सरनाईक, जिल्हा उपाध्यक्ष सुभाषराव खरात, जिल्हा परिषद सदस्य पुरुषोत्तम तहकिक, तालुका सरचिटणीस भूषण पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रभाकरराव तहकिक, भाजप युवा नेते पवन पाटील मोरे, डॉण् दत्तात्रय देशमुख, विजयराव वाघ, कामगार सेल तालुका संयोजक अशोकराव देशमुख, भाजप जेष्ठ सेल प्रकोष्ट



सुभाषराव सरोदे, हरिभाऊ गाडे, भाजप युवा मोर्चा जिल्हा प्रसिध्दी प्रमुख गणेश देगावकर, रामदास आढाव, तालुका कोषाध्यक्ष संजय वाघ, गोपाल वाघ, सुरेश जाधव, विलास बेदरे, विनोद देशमुख, नंदकिशोर देशमुख सहित मान्यवर मंडळी उपस्थित होती.